
# श्रीसाईलीला



किं ५० न पै

स्थापना १९१६



साईबाबांच्या

मूर्ती पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



# श्री साई वाक्सुधा

"तूं भोजन करायला बसली असतां तुझ्या दारीं एकाएकीं भुकेनें व्याकुळ झालेला कुत्रा आला तर मीच त्या रूपानें आलों आहें असें समजून अगोदर त्याची भूक शांत कर. सर्वांग चिखलानें माखलें आहे असा एखादा डुकर भुकेनें व्याकुळ झालेला तुझ्या पहाण्यांत आला तर तोहि मीच आहें असें समजून त्याच्या भुकेची काळजी वहा–" बाबांचें हें बोलणें ऐकून ती बाई आश्चर्यचकित झाली. कुत्रें, मांजरें, डुकरें हीं सारीं बाबांचीच स्वरूपें आहेत का? असा ती विचार करूं लागली. "मी कधीं कुत्रा, कधीं डुकर, कधीं गाई, तर कधीं मांजर तर कधीं कधीं मुंगी, माशी अशा विविध स्वरूपांत वावरत असतों. यासाठीं, पाहीं भूत-मात्रीं जो मज। तोचि माझिया प्रीतीचा समज। तरी तूं भेदबुद्धीतें त्यज। ऐशीच भज मजलागीं" ॥

— श्रीसाईसच्चरित


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ३८ वें ] सप्टेंबर १९६० [ अंक ६ वा

: संपादक :

नागेश आत्माराम सावंत

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. २५१२७४

: कार्यालय :

ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग, ४९/५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १.

# प्रिय वाचक—

श्रीसाईबाबांच्या जीवनकार्यांचा जों जों विचार करावा तों तों मति गुंग होऊन जाते. पुढील महिना हा त्यांच्या पुण्यतिथ्योत्सवाचा आहे. त्यांच्या भक्तांना त्यांच्या अवतारकार्याचें पुण्यस्मरण हरघडी होत असतें. त्यांच्या जीवनांतील अनेक गोष्टींपैकीं एका गोष्टीचें महत्व फार मोठें आहे. दीनदुबळ्यांचें दुःख दूर करण्यासाठीं ते परोपरीनें झटत असत. पूर्वकर्मानुसार एखाद्याच्या वाट्यास सुखदुःखाचे प्रसंग भोगण्याचें येत असतें; परंतु ज्यांच्या वांट्यास दुःखभोग येतात ते दूर करण्यासाठीं किंवा हलके करण्या-साठीं झटणें हीच भगवंताची खरीखुरी सेवा आहे. हा सेवाभाव व त्याचें मर्म ज्यांनीं जाणलें ते धन्य होत.

दीन दुबळ्यांची सेवा करून त्यांचें दुःख हलकें करण्यासाठीं झटून बाबांनीं सेवाभावाचा उच्च आदर्श तुम्हां आम्हांपुढें ठेविला आहे. दीन दुबळ्यांची दया कोणी करावयाची ! परमेश्वरानें किंवा त्याचेंच अंश जे संत महात्मे त्यांनीं. प्रत्येकजण आपल्याच सुखःदुखांत गुरफटलेला आहे. दुसऱ्यासंबंधीं किंवा दुसऱ्याच्या दुःखासंबंधीं विचार करायला वेळ कोणाला आहे !

जेथें साधुत्व आहे, दिव्यत्व आहे, तेथेंच दीन दुबळ्यांसंबंधीं विचार जागा होणार. मातेची वत्सलता आपण जाणतों. मूल कसेंही असो. त्याची जीवेंभावें सेवा करण्यांत मातेला आनंद वाटतो. त्या सेवेचें ती कधीं प्रदर्शन करीत नाहीं. त्याचा अहंकारही बाळगीत नाहीं. तो तिचा सहजभाव असतो.

त्याचप्रमाणें ‘ ज्यासी आपंगिता नाहीं,’ त्याला हृदयाशीं कवटाळणें व तेंही सहज कर्तव्यबुद्धीनें करणें, यांत साधुत्व आहे. बाबांनीं सेवाभावाचा हा उच्च आदर्श सर्वांपुढें ठेविला आहे, तो त्यांच्या कल्याणासाठींच होय.

दीनदुबळ्यांची सेवा म्हणजेच देवाची भक्ति, ही बाबांची शिकवण आमच्या आचरणांत आणण्यासाठीं आम्हीं अहर्निश झटलें पाहिजे. कोणाजवळ धनधान्य असतें, कोणाजवळ बुद्धिज्ञान वगैरे असतें. जें कांहीं असतें त्याचा उपयोग आम्हीं केवळ स्वार्थी-साठींच करावयाचा काय ? ज्याच्याजवळ जें कमी असेल तें देऊन त्याला सुखी व आनंदी करणें म्हणजेच परमार्थ साधणें होय.

आणि तो साधण्यासाठींच तर तुमचा आमचा जन्म आहे. आम्हीं एकमेकांचीं दुःखें व अडचणी समजून घ्याव्या व तीं दूर करण्यासाठीं झटावें यांतच मानवजन्माची सार्थकता आहे. बाबांनीं जीवन सफळ करण्याचा महामंत्र आपल्या प्रत्यक्ष आचरणाच्या रूपानें आम्हांला दिलेला आहे.

आम्हीं चार पैसे जवळ करतों. भल्याबुऱ्या मार्गांनें ते आमच्या जवळ येतात. जवळ चार पैसे झाले म्हणजे केवढा आनंद होतो आम्हांला ! त्याचबरोबर सुखाचे व ऐष-आराम भोगण्याचे विचार मनांत घोळूं लागतात; परंतु त्या संपत्तींत गोर गरिबांचा व दीन दुबळ्यांचा हिस्सा आहे, हा विचार आमच्या मनांत डोकावत नाहीं. तो कसा डोकावेल ! जे पुण्यवान् असतील त्यांच्याच मनांत त्याचा संचार होईल.

बाबांची भक्ति करीत असतां दीन दुबळ्यांच्या सेवेचा विचार आमच्या मनांत आला नाहीं, त्यांच्याकडे आमचें लक्ष वळलें नाहीं व त्यांची सेवा म्हणजेच बाबांची भक्ति यांची खूणगांठ आम्हीं बांधू शकलों नाहीं, तर बाबांचे भक्त आम्हीं होऊं शकणार नाहीं.

देव धनिकांस धन दौलत देऊन चुकलेला असतो. तो त्यांच्या जवळपास नसतो. तो असतो दीन दुबळ्यांच्या आसपास. ज्या ज्या ठिकाणीं दैन्य आहे, तेथें तेथें दीनांचा कनवाळू भगवान् असतोच म्हणून समजावें. आणि यासाठीं त्यांच्या सेवेंत तत्परता दाखविणें, हीच भगवंताची सेवा होऊं शकते.

तुम्हीं कुणाचें खातां आणि कुणाचें देतां ? ' त्वदीयं वस्तु गोविंद तुभ्यमेव समर्पये. सारें त्या गोविंदाचें. त्यानेंच दिलेलें, तें ज्याच्याजवळ नसेल त्याला द्यायचें आणि मोकळें व्हायचें, अशा प्रकारच्या भावनेनें आपल्या अंतःकरणांत कायमचें घर केलें पाहिजे.

गरिबांचा वाली व त्यांचा सखा परमेश्वर. गेल्या महिन्यांत आपण श्रीकृष्ण जयंति साजरी केली. श्रीकृष्ण आणि सुदामा यांच्यामध्यें सांपत्तिक दृष्ट्या केवढी तफावत होती ? परंतु दोघांचेंही एकमेकांवर अतुलनीय प्रेम होतें. सुदामा द्वारकेंतील श्रीकृष्णाच्या राजवाड्यांत गेला असतां त्यानें किती प्रेमानें व आपलेपणानें सुदामजीला वागविलें ? तो बंधुभाव आमच्याठायीं आला पाहिजे.

मनुष्य कोणत्याही रोगानें पिडलेला असो, बाबा त्याच्या सेवेंत आनंद मानीत असत. धनिकांकडचें द्रव्य घेऊन तें गरजवंताला हटकून देत असत. हें सारें कशासाठीं ? तीच भगवंताची खरीखुरी सेवा, या गोष्टीची तुम्हां आम्हांला शिकवण मिळावी, खरी देवभक्ति कशांत आहे याची आम्हांला जाणीव व्हावी, यासाठींच ते तसे वागत असत.

बाबांची भक्ति करीत असतां त्यांना कोणत्या गोष्टी आवडत असत, या जगांत मानवरूपानें वावरत असतां त्यांचें विशेष लक्ष कोणत्या गोष्टीकडे असे व आम्हांकडून ते कोणत्या गोष्टींची व कोणत्या प्रकारच्या आचरणाची अपेक्षा करीत असत हें आम्हीं जाणून घेऊन त्याप्रमाणें वागूं लागलों तर त्यांतच आम्हांला आमचें कोटकल्याण साधतां येणार आहे.

—संपादक

---




*************** संकलक : आमचे प्रतिनिधि ***************

## नामें पाषाण तारिले

**श्री.** वामन रंगनाथ गोखले, व्हल्कन इन्शुअरन्स कंपनी, पुणें शाखा हे लिहितात कीं, पुणें महानगरपालीकेचे पहिले महापौर श्री. बाबुराव नारायणराव सणस हे आपल्या मित्रमंडळीसह पुण्याहून दिल्लीस कांहीं कामाकरितां मोटरनें निघाले. त्यांत प्रामुख्यानें पुण्याचे ॲडव्होकेट श्री. वसंतराव देशमुख हेहि होते. श्रीसाईबाबांवर वसंतरावांचा तितकासा विश्वास नव्हता. मोटर गुणा गांवाच्या अलिकडे १५–२० मैल अंतरावर आली असेल. सडकेवर एका लहानशा दगडावर कांहीं होले ( पक्षी ) बसले होते. ड्रायव्हरच्या मनांत होले मारण्याचें आलें आणि त्यानें मोटर त्या पक्षांच्या अंगावर घातली, पक्षी ज्या दगडावर बसलें होते त्या दगडाची ठोंस मोटरच्या चेंबरला लागून चेंबरला भोंक पडलें व इंजिनमधील तेल जोरानें गळूं लागलें. मोटर लगेच थांबविण्यांत आली. श्री. बाबुराव खालीं उतरले व गळत असलेलें तेल एका डब्यांत व पाणी पिण्याच्या तांब्यांत धरलें व सडकेच्या कडेला जाऊन मोटरकडे पहात काय करावें याचा विचार करीत उभे राहिले. जंगलांत काय करावें, चेंबर दुरुस्त कसें होणार याचा सारखा विचार करूं लागले. तोंडानें म्हणूं लागले बाबा मी काय अपराध केला म्हणून मला जंगलांत आणून उभें केलेंत. थोड्याच वेळांत त्यांना एक साधारण उपाय सुचला. गाडींत अंगाला लावण्याचा हमाम साबण होता. तो त्यांनीं ड्रायव्हरला आणावयास सांगितला व सांगितलें कीं साबण चांगला ठेंच व भोंक पडलें आहे तिथें चांगला मजबूत लाव व श्रीबाबांचें नांव साबण लावतांना घे. ड्रायव्हरने बाबांचें नांव घेतलें व ठेंचलेला साबणाचा गोळा भोंक पडले होतें त्या ठिकाणीं चेंबरला लावून टाकला. इंजिनमध्यें पुन्हां तेल टाकण्यांत आलें व गाडी चालू केली हळु हळू गाडीनें गुणा गाठलें पण तेल गळण्याचे नांव नाहीं. गुण्यास कोणी रिपेअर करणारा न भेटल्यामुळें श्री. बाबुराव यांनीं बाबांचे नांव घेतलें व गाडी दिल्लीचा मार्ग आक्रमूं लागली. कांहीं एक त्रास न होता गाडी सरळ २००–३०० मैलांचा प्रवास करून दिल्लीस पोंचली. गाडी दुरुस्तीच्या कारखान्यांत दुरुस्तीकरितां जेव्हां टाकली तेव्हां तेथील लोकांनीं साबणाचा प्रकार पाहून आश्चर्यानें तोंडांत बोटें घातलीं. चेंबरमध्यें सारखें इंजिन मधील गरम तेल असतें. अशा परिस्थितींत साबणानें टिकाव कसा

धरला. याचें कारण साई बाबांच्या नावांत असेलेली करामत. बाबांचें नुसतें नांव वाटेल तें करूं शकतें. 'नामें पाषाण तारिले' मग साबणाची काय कथा ? हे सर्व वसंतराव देशमुखांनी पाहीलें व त्यांचे डोळेही पाण्यानें ओले झाले. त्या क्षणापासून मनानें ते श्री साईबाबांचे भक्त बनले. श्री. बाबुराव सणस म्हणतात कुठल्याही संकटकाळांत बाबांचे नांव घेऊन करुणा भाकली कीं बाबा पाठीशीं संकट निवारण्यासाठीं उभे असतात असा माझा अनुभव आहे.

## अपघात प्रसंगीं बाबांचें सहाय्य

श्री. कमळाकर देसाई सेंट पिटर्स हायस्कूल, पांचगणी हे लिहितात कीं, दोन वर्षांपूर्वी घडलेली हकीगत आपल्या मासिकांत भक्तजनांच्या माहितीसाठीं पाठवीत आहे ती अशीः—आम्ही म्हणजे मी, वडील व आई कांहीं कामाकरतां मुंबईस गेलों होतों. काम वगैरे आटोपून इकडे यावयास निघालों. तो शनिवार व नारळी पौर्णिमेचा दिवस होता. आम्ही १२ वाजतां निघालों. खंडाळा घाट उतरून व्यवस्थित पुण्याच्या रस्त्याला लागलों. पुण्यापासून सुमारें २७ मैलांवर आमच्या गाडीचा स्टेअरिंग रॉड तुटला व वेगांत असलेली गाडी सात फूट नाल्यामध्यें पडली. गाडीचा वेग पहातां गाडी नाल्यांत जोरांत पडावयास पाहिजे होती. पण श्री बाबांची लीला अघटीत म्हणावी लागेल. गाडी अगदीं सावकाश नाल्यांत पडली. गाडीचा टप चेपला गेला, वरचें सामान लांब उडालें. पण आंतील माणसांना म्हणजे मला, वडिलांना, आईला व ड्रायव्हरला मुक्या माराखेरीज कांहींच झालें नाहीं. आमच्या गाडींत बाबांचा फोटो आरसा शेजारीज लावलेला आहे. जवळपास कोणतेंहि गांव नव्हतें. पडलेली गाडी काढणें जरूर होतें म्हणून मी व ड्रायव्हर लोणावळ्याला क्रेन आणण्यासाठीं गेलों. इकडे एस. टी. आली. त्यांतील कंडक्टरनें आई वडिलांना औषध लावलें. आम्ही एक टॅक्सी ठरविली. कारण निदान आई, वडिलांना पुण्यापर्यंत पोचवावयास पाहिजे होतें. आम्ही टॅक्सी घेऊन आलों तर ५०–६० माणसें जमलेलीं दिसलीं. मुंबईहून निघालेला एक खोजा व्यापारी पांचगणीला आपल्या बायको मुलांसहित जात होता, तो थांबला. त्यानें लोक जमा केले. आणि त्यांच्या मदतीनें त्यानें गाडी काढली. नंतर एका रिकाम्या ट्रकला थांबवून त्यांत ती त्या लोकांच्या मदतीनें उचलून ठेवली. त्या लोकांना मीं पैसे देत असतां मला त्यानें देऊं दिले नाहींत तर त्याने स्वतः पैसे दिले. नंतर त्यांच्या गाडींत गर्दी असतांना सुद्धां आईला व वडिलांना त्यानें पांचगणीला पोंचविलें. आमच्यासाठीं त्यानें आपल्या लहान लहान मुलांची विशेष काळजी केली नाहीं. असा तो थोर महात्मा बाबांच्या रूपानें आला, अशी माझी मनोदेवता सांगते. श्रीबाबाच धावून आले यांत कसला संशय ! तो गृहस्थ जर इतकी मदत न करता तर भयाण रानांत आमची काय स्थिति झाली असती याचा विचार केला म्हणजे अजूनहि शहारे येतात. त्या साई-रूपी व्यापाऱ्याचें ऋण फिटणें कठीण वाटतें. अशी ही बाबांची लीला अगाध आहे. बाबा भक्तांकरतां धावून आल्याशिवाय कधींच रहात नाहींत.

## संकटप्रसंगीं बाबांचा आधार

श्री. शिवदास दगू–पूर्णा ( मराठवाडा ) हे आपला अनुभव पुढीलप्रमाणें कळवितात :—१९५३ च्या जुलै महिन्यांत माझी व्यापाऱ्याकडे असलेली नोकरी एकाएकीं सुटली. ते दिवस पावसाळ्याचे होते. कुटुंबपोषणाची जबाबदारी कशी पार पाडावी या विवंचनेंत मी होतों. कांहींतरी उद्योग, हालचाल करणें अत्यंत जरूर होतें. स्वस्थ बसून रहाण्यांत धोका होता. शेवटीं शंभर रुपये भांडवल जमा केलें व त्या तुटपुंज्या भांडवलावर मिरचीचा व्यापार सुरू केला. पूर्णा येथें मिरची खरेदी केली व मालेगांवास भाव चांगला येतो असें समजल्यावरून मिरची त्या गांवीं रेल्वेनें घेऊन जाण्याचें ठरविलें. गाडींत श्रीबाबांच्या दर्शनार्थ शिरडीस जाणारी कांहीं मंडळी भेटली. बाबांचा महिमा मी फार दिवसांपासून ऐकत होतों; परंतु शिरडीस जाण्याचा योग आला नव्हता. कोणत्याहि गोष्टीस योग जुळून यावा लागतो. मनांत बाबांची प्रार्थना करूं लागलों—' बाबा माझ्यावरील संकट टाळा, मला या व्यवसायांत दोन पैसे मिळूं द्या. मी लौकरच तुमच्या दर्शनास शिरडीस येईन. '

नंतर मनमाड स्टेशन आलें, प्लॅटफॉर्मवर उतरतांच एक ओळखीचे व्यापारी भेटले. विचारपूस झाली. ते म्हणाले. ' कशाला जातां मालेगांवला ! त्यापेक्षां तुमच्या मिरचीला मनमाडांतच भाव चांगला येईल ' त्यांचें म्हणणें पटून मी मालाची पोतीं खालीं उतरवून घेतलीं व बाजारांत जाऊन मालाची विक्री केली; त्यांत मला अपेक्षेबाहेर चांगलाच नफा मिळाला.

त्यानंतर विलंब न लावतां मी शिरडीस गेलों. तेथें भक्तिभावानें बाबांची पूजाअर्चा केली. माझें दुःख मी बाबांच्यापुढें ठेविलें. बाबा करुणासागर आहेत ते माझें दुःख निवारण करतील अशी माझी श्रद्धा होती.

प्रसाद घेऊन घरी गेलों. आईला व भावंडांस घडलेला सर्व वृत्तांत सांगितला. त्यानांहि प्रेमाचें भरतें आलें. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यानंतर २।३ दिवसांनीं मला चांगली नोकरी चालून आली. त्या नोकरीवर माझी उत्तरोत्तर बढती होत गेली. आज बाबांच्या कृपेनें कुटुंबांतील मंडळीसह मी सुखसमाधानांत आहे. कोणतेंहि संकट येवो. बाबांची प्रेमभावानें आठवण केली असतां तें दूर होतें असा आमचा अनुभव आहे.

## भक्ताची बाबांना काळजी

बाबांचे जे परमभक्त असतात व जे श्रद्धेनें त्यांचें चिंतन करतात त्यांना बाबा आपल्या अस्तित्वाचा अनुभव आणून दिल्याशिवाय रहात नाहींत हा एक जुना अनुभव आहे. किती जुना ? १९३३ सालांतला. कांदिवली येथें वास्तव्य करणारे श्री. आनंदराव प. डोळस हे लिहितात कीं, श्री. कृष्णराव पंडित हे त्याकाळीं आफ्रिकेंत नोकरीवर होते. ते साईबाबांचे भक्त होते. भारतांत आले म्हणजे शिरडीस बाबांच्या दर्शनास गेल्याशिवाय रहात नसत. एकदां त्यांनीं श्रीबाबांस देणगीदाखल पांच शिलिंगांची एक पोस्टल ऑर्डर पाठविली. बँकेंत काम करणाऱ्या माझ्या एका नातेवाईकामार्फत

ती वटावून ती त्यावेळीं श्रीसाईलीलेच्चे खजिनदार श्री. बाबासाहेब तर्खड यांस द्यावी म्हणून ते खारला रहात असल्यामुळें त्यांना पोहोंचती करण्यासाठीं ऑफिसमधून परत जात असतां त्या स्टेशनवर उतरलों. त्यांच्या घरीं गेल्यानंतर बोलण्यांत व चहा-पाण्यांत अर्धा तास केव्हांच निघून गेला. नंतर घरीं परत जाण्यासाठीं मी खार स्टेशनवर आलों. पहातों तों काय ? इंडिकेटरवर अंधेरी लोकल साडेसातची लागली होती. वाईट वाटलें. घरीं जायला बरीच रात्र व उशीर होणार म्हणून कष्टी झालों. दुसरी बोरिवलीची गाडी ७-४० ची होती. विचार करीत होतों तोंच स्टेशनांत उभी न रहाणारी एक फास्ट लोकलगाडी अचानक स्टेशनांत थांबली. कोणी तरी सांखळी ओढल्यामुळें गाडी थांबविण्यांत आली होती व ड्रायव्हर कोणी साखळी ओढली व कां ओढली याचा तपास करण्यासाठीं खालीं उतरला.

बाबांच्या कामासाठीं मी खारला उतरलों होतों. बाबांना माझी काळजी. माझ्यासाठीं त्यांनींच ही गाडी थांबविली असे विचार मनांत घोळत असतांच मी डब्यांत चढलों. त्याच डब्यांत माझ्या ओळखीचा आमचा वाणी भेटला. तो थट्टेनें मला म्हणाला, 'काय राव ! जणूं काय ही येथें न रहाणारी गाडी तुमच्यासाठींच येथें उभी राहिली ! भाग्यवान् अहांत !'

'त्यांत भाग्य कसलें ? मी श्रीबाबांच्या कामानिमित्त येथें उतरलों होतों. घरच्या मंडळींनें माझी काळजी करूं नये व मला ठपका देऊं नये म्हणून त्यांनींच ही गाडी उभी केली नसेल कशावरून ?'

बाबांच्या लीलेचा स्वतःशींच विचार करीत मी घरीं गेलों.

## एक संस्मरणीय अनुभव

श्री. विठ्ठलराव कल्याणपूर, ताडदेव, चिखलवाडी, हे फार वर्षांपूर्वीचा अनुभव सांगतांना लिहितात कीं, १७।१८ वर्षांपूर्वी आमच्या शेजारीं परभू जातीचे एक गृहस्थ रहात असत. ते डॉक्टरी परीक्षेचा अभ्यास करीत होते. त्यांचा व माझा शेजारधर्मामुळें निकट संबंध होता. ते गृहस्थ फार अभ्यासू होते; परंतु डॉक्टरी परीक्षा फार कठीण. तिच्यांत यश मिळावें म्हणून बाबांच्या नांवें त्यांनीं कांहीं सेवारूपी संकल्प केला. तो त्यांनीं विठ्ठलरावांस किंवा कोणास सांगितला नव्हता. ते आपल्या परीक्षेच्या तयारींत अतिशय गढून गेले होते. त्यांनीं केलेला संकल्प पूर्ण करून मोकळे होणें जरूर होतें. परंतु परीक्षेच्या गडबडींत त्यांना आठवण राहिली नाहीं. परीक्षेच्या दिवशीं पहांटेच्या प्रहरीं त्यांना एक स्वप्न पडलें. स्वप्नांत एक वयोवृद्ध फकीर त्यांना दिसला. तो म्हणत होता कीं, अरे तूं डॉक्टर होणार ना ? तुला दवा देणें कळतें ना ? मी पोटांतल्या दुखण्यानें लई बेजार झालों आहे. त्यासाठीं मला कांहींतरी दवा त्वरित दे पाहूं ! नाहींतर मला दुसऱ्या डॉक्टरकडे धांव घ्यावी लागेल !

'नको जाऊं' मी म्हणालों; आणि लगबगीनें घरांत जाऊन कांहीं औषध देण्यासाठीं घेऊन आलों; परंतु परत येतों तर तो फकीर नाहींसा झालेला होता.

तें विव्हळणें व ती उतावीळ भयंकर होती. स्वप्न पडलें आणि तेंही परिक्षेच्या दिवशीं. त्या गृहस्थास त्याचा अर्थबोध होईना; म्हणून ते माझ्याकडे येऊन मला त्यांनीं स्वप्नाची सारी हकिगत सांगितली.

मी त्या स्वप्नावर विचार करूं लागलों. मी त्यांना विचारलें, तुम्हीं साईबाबांना कधीं नवस केला होतां का ?

तो गृहस्थ म्हणाला, ' होय; केला होता परंतु तो मी साफ विसरून गेलों होतों.

नंतर मी त्यांस म्हणालों, " श्री साईबाबा हे संकट प्रसंगीं धांऊन येणारे आहेत. तुम्हांला जें स्वप्न पडलें त्या द्वारें त्यांनीं तुम्हांला असें सुचविलें असावें कीं, पोटांतील विकारासंबंधीं तुम्हांला प्रश्न विचारला जाणार आहे. पोटांतील गंभीर स्वरूपाच्या विकारावर कोणता इलाज व औषध योजना करावी हें त्या प्रश्नाचें स्वरूप असावें. तरी ही सावधगिरीची सूचना लक्षांत घेऊन तुम्हीं त्यासंबंधीं वाचन करावें, हा माझा आपला कयास आहे. पाहूं या आज काय अनुभव येतो तें. "

त्या गृहस्थांनीं त्या विषयासंबंधीं ग्रंथ चाळून शक्य तेवढा विचार करून ठेविला. परीक्षेस बसले तेव्हां आश्चर्याची गोष्ट म्हणजे पोटांतील दुखी व त्यावर उपाययोजना या संबंधीं एक महत्वाचा प्रश्न पेपरमध्यें आला होता. आगाऊ सूचना मिळाल्यामुळें त्या गृहस्थांनीं त्या प्रश्नाचें उत्तर अत्यंत समाधानकारक रीतीनें लिहिलें व त्या परीक्षेंत ते उत्तम प्रकारें उत्तीर्ण झाले.



हे भगवान् ! संपदा, मुलेंबाळें, स्त्रिया व सौख्य यांपैकीं मी कांहीं मागत नाहीं. जन्मोजन्मीं तुझ्या भक्तीचें वेड मला लागो व तुझा विसर क्षणभरही न पडो, एवढें मला दे.

**—भागवत पुराण**

निरनिराळीं कार्यें पार पाडण्यासाठीं पंचवार्षिक योजना आखण्यांत येत आहेत. अधिक धान्य पिकवा, जंगलवृद्धि करा व आणखी कांहीं वृद्धि करा म्हणून सतत मोहिमा चालू आहेत; परंतु माणसाची नैतिक पातळी वाढावी, त्याचा सद्वर्तन, शिस्त व सुसंस्कृति यांचा लाभ व्हावा यासाठीं मात्र कोणी एखादी पंचवार्षिक योजना पुढें आणीत नाहीं.

**—स्वामी शिवानंद**

# भगवद्भक्त शेख महंमद

******************************

## रामनाम कोणीही घ्यावें

संत तुकारामाच्या काळांतील ही एक कथा आहे. अहमदनगर जिल्ह्यांत श्रीगोंदे या नांवाचा तालुका असून त्या तालुक्यांतील एका गावीं मुसलमान कुटुंबांत एक बालक जन्मास आलें. त्याचें नांव ठेवण्यांत आलें शेख महंमद.

तें घराणें सुशिक्षित होतें, खानदानी होतें, खाऊनपिऊन सुखी होतें. बालपणापासून महंमदला अरबीचें शिक्षण देण्यांत येऊन 'कुराण शरीफ' हा पवित्र ग्रंथ त्याच्याकडून तोंडपाठ करून घेण्यांत आला होता. तो सोळा वर्षांचा झाला तेव्हांपासून त्याला 'मुल्ला' बनविण्यांत आलें.

एके दिवशीं पिताजीच्या मनांत बकऱ्याची कुरबानी करण्याचा धडा मुलास शिकवावा असें आलें. त्याच्या हातांत एक सुरा देण्यांत येऊन बकऱ्यासह त्याला गांवांबाहेर असलेल्या एका बगिच्यांत पाठविण्यांत आलें. बकऱ्यास एका झाडाला बांधून महंमद एका दगडावर सुरीला खसखशीत धार काढूं लागला. धार काढतां काढतां जवळच बांधून ठेवलेल्या बकऱ्याकडे त्याची दृष्टि गेली. सुरीचें पातें चकाकत होतें. परंतु बकऱ्याचें तोंड भीतिनें काळवंडून गेलें होतें. आतां आपल्यावर कोणता दुर्धर प्रसंग ओढवणार याची बकऱ्यास जाणीव होऊन चुकली होती.

शेखचे आणि बकऱ्याचे चारी डोळे एकत्र झाले, तें कारुण्यानें थबथबले होते. जणूं काय ते एकमेकांशीं बोलत होते. महंमद स्वतःशीं विचार करीत होता, 'या प्राण्याच्या मानेवर ही सुरी मी आतां चालविणार! त्यावेळीं त्याची काय बरें स्थिति होईल? त्याला किती असह्य वेदना होतील बरें!'

हे विचार मनांत येऊन तो थांबला नाहीं. त्याला त्या वेदनांची प्रचीति घ्यावीशी वाटली, त्यासाठीं आपल्या डाव्या हाताची छोटी करंगळी त्यानें खसकन् कापली!

"हाय! हाय!! किती असह्य वेदना ह्या! त्या माझ्यानें सहन करवत नाहींत मग या बकऱ्यानें मान कापली जात असतां होणाऱ्या वेदना कशा बरं सहन कराव्या? छे बुवा! हें काम आपल्याच्यानें होणें शक्य नाहीं!" असें म्हणून महंमदनें सुरी शेतांत दूर फेंकून दिली व बकऱ्याला शेतांत स्वच्छंदानें चरण्यासाठीं मोकळा सोडून दिला.

असें करीत असतां त्याच्या मनाला किती तरी समाधान वाटलें व समाधानवृत्तीनें तो घरीं परतला; परंतु तेथें असमाधान त्याची वाट पहात होतें.

'काय रे बकरा कुठें?' बापानें विचारलें.

'बकरा होय ? कुठें तरी शेतांत असेल चरत !' मुलानें उत्तर दिलें.

'आणि सुरी काय केलीस ?'

'दिली कुठें तरी दूर फेकून !'

'अरे ! काय केलेंस हें ! मुल्ला बनविला आहे तुला ! मुल्लानें कुरबानी करणें जरूर असतें बाबा !'

'परंतु मला मुल्ला व्हायचें नाहीं !'

'कुरबानी करणें हा मुसलमानाचाही धर्म आहे !'

'मला मुसलमानही रहावयाचें नाहीं !'

'माझ्या घरांत रहावयाचें तर कुरबानी केल्याशिवाय राहतां यावयाचें नाहीं !'

"मी तुमच्या घरांत राहूं इच्छित नाहीं ?"

महंमदानें असें म्हटल्याबरोबर त्याच्या बापाचें पित्त खवळलें ! हा काय फाजील-पणा ! त्यानें पायांतील चप्पल काढून रागाच्या भरांत महंमदला बडव बडव बडविलें.

शेवटीं म्हणाला, निघ माझ्या घरांतून आत्ता ? तुझं तोंड नाहीं पहायचें मला ? चल निघ येथून ! "

सोळा वर्षांचा महंमद देवावर भरिभार टाकून व सर्वांना नमस्कार करून त्या घरांतून बाहेर पडला !

× × ×

शेख महंमद भटकत भटकत अनेक ठिकाणीं गेला. त्याला हिंदुधर्माचा स्वीकार करायचा होता. अनेक पंडितांना व थोरामोठ्यांना तो भेटला. त्या काळांत आर्यसमाजासारख्या संस्था अस्तित्वांत आल्या नव्हत्या. हिंदुधर्म आजच्यासारखा व्यापक बनला नव्हता. त्यामुळें त्याची कुचंबणा झाली. परंतु परमेश्वर आपला पाठीराखा आहे, तो आपणास कोणत्याहि स्थितींत अंतर देणार नाहीं अशी त्याची श्रद्धा होती. त्याला कोणाचा शिष्यहि बनतां आलें नाहीं. एका थोर पंडितानें त्यांतल्या त्यांत समाधानकारक सल्ला दिला. 'कोणाचाही शिष्य बनतां आलें नाहीं तरी रामनामावर प्रत्येकाचा हक्क आहे. रामनाम कोणीही घ्यावें व स्वतःचा उद्धार करून घ्यावा. तूं रामनामाचा जप श्रद्धापूर्वक कर. त्यांतच तुझा उद्धार आहे."

महंमदनें त्या पंडितालाच आपला गुरु मानून रामनामाचा जप सुरू ठेवला. त्याला जें हवें तें मिळालें होतें.

सतत चौदा वर्षे त्यानें तपस्येंत घालविलीं. त्यानें रामनामाचा ध्यास सतत लावून घेतला. एकनिष्ठ तपस्येचें फळ मिळावयाचेंच. त्याप्रमाणें शेख महंमदला तें मिळालें.

फिरत फिरत शेख महंमद एकदां श्रीगोंदे गांवीं आला. त्याची प्रतिभा आतां जागी झाली होती. तिला विविध पैलू पडले होते. तो सुंदर कविता करीत असे. त्या

गांवांत हरिकीर्तन चाललें होतें. रात्रीची वेळ होती. त्या कीर्तन संमेलनांत महंमद सामील झाला. आनंदानें नाचूं लागला. रामनामाचा गजर करूं लागला.

त्यावेळीं त्याच्या मुखावाटे पुढील चरण सहजगत्या बाहेर पडले:—

**' ओम् नमोजी अव्यक्ता रामा । परात्पर मेघश्यामा ॥**
**ब्रह्मादिकां न कळे महिमा । अविनाश म्हणवुनियां ॥**

कीर्तनांत या ओवीचें त्यानें रसभरीत सुंदर विवरण केलें. रामनामाचा महिमा सर्वांना परोपरीनें पटवून दिला. नामसंकीर्तनाच्या आनंदांत सारे श्रोते दंग होऊन गेले होते. इतक्यांत शेख महंमद मध्येंच एकाएकीं धांवत सुटले. एका विहिरीपाशीं जाऊन घागरी भरभरून पाणी काढूं लागले व तें इतस्ततः फेकूं लागले ! कांहीं वेळानें ती क्रिया थांबवून ते मंडळींत आले व पुन्हां कीर्तन सुरू झालें.

सभोंवारचे सारे लोक आश्चर्यानें थक्क होऊन महंमदाकडे टक लावून पाहूं लागले. एका गृहस्थानें मध्येंच उठून जाऊन पाणी शिंपडण्याचें कारण विचारलें. तेव्हां ते म्हणाले,' देहू गांवीं याच वेळीं संत तुकोबाचें कीर्तन चालू आहे. सारे लोक कीर्तनानंदांत डोलत असतां मंडपानें पेट घेतला, तो विझविण्यासाठीं मी पाणी शिंपडीत होतों ! त्यामुळें आग शांत झाली. ”

सारे लोक हें ऐकून अधिकच बुचकळ्यांत पडले. देहूगांव कुठे, कीर्तन कुठे आणि तेथें आग लागल्याची बातमी येथवर आली कशी हें त्यांना मोठेंच कोडें वाटूं लागलें.

एक गृहस्थ म्हणाले, ' तुकाराम महाराज विठोबाचे भक्त; मग त्या संकट प्रसंगीं विठोबा कसे धाऊन आले नाहींत ? का तेही इतर लोकांप्रमाणें कीर्तनानंदाच्या गुंगींत होते ? '

' होय, आपल्या भक्तानें चालविलेल्या कीर्तनांत विठोबाही रंगून गेले होते. त्यांना भान राहिलें नाहीं ! '

दुसरे एक गृहस्थ म्हणाले, ' बरें मग देहूला आग लागली ती येथें आपणास समजली तरी कशी ? '

' संजय दिल्लींत होते. तेथून सुमारें शंभर मैलांवर कुरुक्षेत्र. तेथें द्रोणाचार्यांचा वध झाला हें त्यांना कसें समजलें ? कारण दोन डोळ्यांशिवाय त्यांनीं तिसरा शिवनेत्र प्राप्त करून घेतला होता. योगसाधन करून तो नेत्र मिळवितां येतो व त्याच्या सहाय्यानें कुठें कांहीं घडलें तरी तें सहज समजतें ' शेख महंमदनें उत्तर दिलें.

परंतु श्रोत्यांचा या सांगण्यावर पूर्ण विश्वास बसेना. त्यांना खात्री करून घ्यायची होती. संशय निरसन करून घेण्यासाठीं एक इसम घोडेस्वार होऊन देहूला जायला तयार झाला. त्याच्याबरोबर देहूच्या पाटलास एक पत्र देण्यांत आलें.

दुसरे दिवशीं घोडेस्वार पाटलाचें उत्तर घेऊन परत आला. पत्रांत लिहिलें होतें— 'परवां रात्रीच्या प्रहरीं तुकाराम महाराजांचें कीर्तन झालें. सारे श्रोते भजनानंदांत दंग होऊन गेले होते. मंडपाला आग कधीं लागली व ती कशी विझविली गेली हें कोणालाही समजलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पहातां मंडपाचा कांहीं भाग जळून खाक झालेला आढळून आला. आग लागल्याचें त्यावरून समजून आलें.'

झालें! एवढ्यावरून सर्वांची खात्री पटली व शेख महंमदावर सर्वांची निष्ठा बसली.

*　　　*　　　*

संत तुकाराम महाराज, जयराम स्वामी व शेख महंमद हे समकालीन व एकमेकांचे परम स्नेही होते. स्वत: शेख महंमद हे सांगत असत कीं, आपण पूर्वजन्मीं ब्राह्मण कुळांत जन्म घेतला होता; परंतु कांहीं तरी चूकभूल होऊन आपणास वेगळ्या धर्मांत जाऊन पडावें लागलें. पूर्व संस्कार कुठें जातात! ते कायम होते.

शेख महंमद यांस पुण्यधाम पंढरपुरचें भारी आकर्षण होतें. त्यांनीं विठ्ठल रुखमाईवर काव्य रचनाही केली आहे. त्यांचे तीन ग्रंथ उपलब्ध आहेत. (१) योग संग्राम, (२) निष्कलंक प्रबोध व (३) पवन विजय.

कविवर्य मोरोपंत यांनीं सन्मणि मालेंत शेख महंमद यांचें व त्यांच्या भगवत् भक्तिचें फार सुंदर व रसभरीत वर्णन केलें आहे.

भगवन्ताला जातपातीचें वावडे नसतें. मानव मग तो कोणत्याही जातींत वा धर्मांत जन्माला येवो, जो कोणी भगवन्ताचें मनोभावें भजन करील त्याला भगवन्त आपलासा करून टाकतो. भक्ति पाहिजे. महत्व जातीला किंवा धर्माला नाहीं. साऱ्या जाती व सारे धर्म आपापल्या परीनें श्रेष्ठ आहेत.

—(कल्याण वरून)

---

जें कांहीं करण्यासाठी हातीं घ्याल तें सर्वोत्कृष्ट करण्यासाठीं झटा. नोकरी करीत आहांत तर ती मनापासून करा. त्यांत कामचुकारपणा बिलकुल करूं नका. प्रेम करीत आहांत तर त्यांत दुजाभाव ठेऊं नका. तें जीवेंभावें करा. प्रार्थना करतां ? तर ती मनापासून व श्रद्धायुक्त अंतःकरणानें करा. अध्यात्माकडे—भगवंताकडे जाण्याचा हाच मार्ग आहे.

—स्वामी शिवानंद

---

# दोषांची नव्हे, गुणांची उजळणी करूं या

लेखक : आप्पाराव

ईश्वरप्राप्तीचे अनेक मार्ग सांगण्यांत आले आहेत; त्यांत स्वतःमध्ये असलेले दोष नाहींसे करण्याचा सतत प्रयत्न करणें, दुसऱ्यांचे दोष झिजवीत न बसतां नेहमीं दैवी गुणांचें चिंतन करीत रहाणें, हा एक मार्ग आहे. स्वतःच्या ठायीं असलेले दुर्गुण दूर करण्याचे दोन मार्ग आहेत. पहिला मार्ग म्हणजे स्वतःचे अवगुण शोधून काढून ते घालविण्यासाठीं सतत झगडत रहाणें व दुसरा मार्ग म्हणजे नेहमीं सद्‌गुणांचें चिंतन करीत राहून ते आपल्यांत यावेत यासाठीं डोळ्यांत तेल घालून सतत जपणें.

केवळ आपल्याठायीं असलेल्या सद्‌गुणांचेंच नव्हे, तर इतरांच्या ठायीं जे जे सद्‌गुण दिसतील त्यांचें सतत चिंतन व आचरण हें नेहमीं सुफलदायी होऊन रहात असतें. आपल्या घरांत भाऊबंदांत, पितापुत्रांत, किंवा बाहेर भागीदारांत मित्रामित्रांत, शेजाऱ्यापाजाऱ्यांत नाना प्रकारच्या कारणांवरून तंटे-भांडणें निर्माण होत असतात. अशावेळीं काय करावयाचें ? दुसऱ्यांचे अवगुण किंवा दोष चव्हाट्यावर मांडवयाचे, ते वारंवार झरवीत रहावयाचें, त्यामुळें दुसऱ्यांचीं मनें दुखवावयाचीं, त्यांच्या मनावर आघात करून स्वतःवरही आघात करून घ्यावयाचे हें बरें आहे का? त्याऐवजीं दुसऱ्याच्या ठायीं असलेल्या सद्‌गुणांची योग्यप्रकारें संभावना करून त्यांना पुष्टि देणें हें अधिक चांगलें नाहीं का ?

एखाद्याचे दोष उगाळून व ते त्याच्या नजरेस आणून देऊन आपण त्याला मुळींच सरळ करूं शकणार नाहीं; उलट त्याच्याशीं शत्रुत्व मात्र पत्करावें लागेल. माणसें तोडणें चांगलें कीं जोडणें चांगलें ! 'फुलें फुलवावीं । तुज म्हणुनी जन्मप्राप्ती' आपणाला हें जग परोपरीनें फुलवावयाचें आहे ? सर्वत्र सुगंध पसरावयाचा आहे. फुलें तोडणें हें आपलें काम नाहीं, त्यासाठीं आपला जन्म नाहीं.

तेव्हां दुसऱ्यांच्या दोषांची उजळणी करीत बसणें हें कोणत्याही दृष्टीनें फायदेशीर नाहीं. त्यामुळें त्याचा फायदा नाहीं व आपला तर नाहींच नाहीं. तोट्याचें प्रमाण मात्र फार मोठें आहे. तेव्हां शहाण्या माणसांनीं त्या फंदांत न पडतां स्वतःला सुधारण्याचा मार्ग स्वीकारावा.

एखाद्याच्या दोषांचें पाठांतर करणें म्हणजे त्याला चिडविणें व त्याचा रोष विनाकारण ओढवून घेणें. हें कर्म शहाण्या माणसानें करूं नये.

दुसऱ्याच्या ठिकाणीं लहानसे गुण दिसले तरी त्यांची भलाई गावी. ती त्याला व स्वतःलाहि पोषक होऊन रहात असते. दुसऱ्याचे दोष न काढणें यांत स्वतःचाहि अपरंपार फायदा असतो.

मी दीनदुबळा, टाकाऊ व कुचकामी आहें असें केव्हांहि समजूं नका. त्यामुळें तुमच्या जीवनांत शुष्कपणा निर्माण होईल, अंतःकरणांत निराशा निर्माण होईल. ती कर्तृत्वाला केव्हांहि प्रेरक नसते. मन कसें नेहमीं उल्हसित व प्रफुल्लित राहिलें पाहिजे.

आपण ईश्वरावर श्रद्धा ठेवली पाहिजे. त्याच्यावर भरिभार टाकला पाहिजे. मनांत केव्हांहि कोणाहीबद्दल मत्सरग्रस्त व दुष्ट विचार येऊं देऊं नयेत. कोणत्याहि परिस्थितींत निराशेचा संपर्क लागूं देऊं नये. ईश्वर माझा नेहमीं पाठीराखा आहे; तो मला केव्हांही अंतर देणार नाहीं, ही श्रद्धा कोणत्याही कार्यांत प्रेरक होऊन रहाणारी आहे. तिची नेहमीं कांस धरावी.

मनांत नेहमीं मंगल विचारांस स्थान द्यावें. त्याऐवजीं मी हीनदीन आहें, माझा सगासोयरा किंवा सहाय्यकर्ता कोणी नाहीं, मी निर्बल आहें, माझ्याकडून कांहीं होणार नाहीं व मी कमनशिबी आहें, अशा प्रकारच्या विचारांचें चिंतन करीत राहिल्यास त्याच पाय मोडून टाकणाऱ्या विचारांचा पगडा तुमच्यावर बसेल व आस्ते आस्ते तसे तुम्हीं नसलां तरी तीच आपत्ति तुमच्या वाट्यास येईल हें निश्चित समजा.

आपल्या मनाची शक्ति मोठी प्रबल आहे. मी बलवान् आहें, या जगांत अशक्य असें मला कांहीं नाहीं, मी वाटेल तें करूं शकेन, अशा प्रकारचे कर्तृत्वशाली विचार मनांत वावरूं लागले तर तेच तुमच्या भाग्योदयाला कारण होतील.

मानसशास्त्राचा बारकाईनें अभ्यास केलेल्या एका युरोपीयन डॉक्टरानें एका ग्रंथांत अनेक उदाहरणांच्या सहाय्यानें ही गोष्ट सुंदर रीतीनें सिद्ध करून दाखविली आहे. तो लिहितोः—एकदां मी एका रोग्यास पहाण्यासाठीं त्याच्या घरीं गेलों. त्याला तपासून पाहिलें तेव्हां त्याला कोणताही रोग नसल्याचें आढळून आलें. जातांना म्हणालों, ' आपणास रोगबीग कांहीं नाहीं. थोड्या वेळानें आपल्या नोकरास पाठवून द्या म्हणजे प्रकृतीसंबंधीं एकंदर रिपोर्ट पाठवून देतों.'

खरोखर त्याला रोग नव्हता. परंतु आपण रोगी असल्याच्या संशयानें त्याला पूर्णपणें पछाडलें होतें. मी घरीं गेलों व रिपोर्ट लिहून पाठवून दिला.

कांहीं वेळानें त्याचा नोकर घाबरलेल्या स्थितींत परत माझ्याकडे आला व म्हणाला, " डॉक्टर साहेब ? आह्मांत तसेच ताबडतोब माझ्याबरोबर या. धन्याची तब्येत एकदम बिघडली आहे, त्यांची धडगत दिसत नाहीं. '

त्याप्रमाणें मी त्यांच्या घरीं गेलों. आणि पहातों तों काय! त्या गृहस्थाची स्थिति खरोखरच अत्यावस्थ झाली होती. तो गारठून थिजून गेला होता ? मला पाहून म्हणाला, " डॉक्टर साहेब ? मी आतां जगत नाहीं! आपला रीपोर्ट वाचतांच मी एकदम खचल्यासारखा झालों. आतां माझ्यांत कांहींच त्राण राहिलें नाहीं ! काय करूं सांगा ? "

मीही थक्क झालों, व रिपोर्ट पहायला मागितला. तो मी वाचूं लागलों त्यांत लिहिलें होतें कीं, आतां यापुढें या जगांत आपण फार वेळ राहूं शकाल असें चिन्ह दिसत नाहीं. जी काय निरवानिरव करायची असेल ती ताबडतोब करून मोकळे व्हा!'

मीच तो रिपोर्ट पाठविला होता; परंतु तो होता दुसऱ्या एका इसमाचा. तो चुकून याच्याकडे पाठविला गेला आणि त्याचा दुष्परिणाम हा असा झाला. केवढा घोटाळा झाला. त्यामुळें एक माणूस निराशेनें पंथाला लागूं पहात होता!

मी त्या गृहस्थाला सर्व खरा प्रकार समजावून सांगितला व चूक कशी घडली तेंही सांगितलें; व त्याची खात्री पटावी म्हणून माझ्या टेबलावर पडलेला तो खरा रिपोर्ट नोकर पाठवून ताबडतोब आणविला.

त्यानें तो लक्षपूर्वक वाचला. त्याच्या चेहऱ्यावर हास्य दिसूं लागलें. तें जगण्याचें सुचिन्ह होतें. नंतर तो गृहस्थ आस्ते आस्ते ठीकठाक होऊन आपल्या उद्योगास उत्साहानें लागला.

हास्य, आनंद हा तर जीवनाचा मुख्य आधार आहे. तो जेणें करून मिळेल, त्याचा फैलाव जेणें करून होईल त्यासाठीं आपण झटलें पाहिजे. ईश्वर आनंदस्वरूप व प्रेमस्वरूप आहे. आपणहि आनंदाची व प्रेमाची जोड लाभावी यासाठीं डोळ्यांत तेल घालून जपत राहिलें पाहिजे. जेणेंकरून परस्परांत प्रेम वसद्भावना यांचीवाढ होत जाईल अशाच रीतीनें आपण वागलें पाहिजे व त्याच मार्गानें प्रत्येक पाऊल टाकलें पाहिजे.

देवत्व संपादण्याचा हा राजमार्ग आहे. त्या मार्गानें आपण जाऊं या व जन्मा आलियाचें सार्थक करून घेऊं या.



# शिरडीस जाणाऱ्या साईभक्तांसाठीं सूचना

## ( व्यवस्थापकांकडून )

१. शिरडीस पोहोंचल्यानंतर चौकशी, चौकशी ऑफिसांत खोलीबद्दल चौकशी करा.

२. खोलींत सामान ठेऊन कुलूप लावल्याशिवाय कोठेंहि बाहेर जाऊं नका.

३. सार्वजनिक हॉटेलमध्यें जागा मिळाली तर तुमचें सामान चीजवस्तु सांभाळण्याची काळजी घ्या. सामानाजवळ आपला एक माणूस बसवून मगच इतरत्र जा. चोर मागावर असतात.

४. स्नानगृहांतून बाहेर येतांना पैशाचें पाकीट, दागिने, हातांतील घड्याळ, कपडे, भांडीं वगैरे बरोबर घेण्यास विसरूं नका.

५. अंगावर दागिने असलेल्या आपल्या लहान मुलांना एकटें सोडूं नका.

६. श्रींचे आरतीचे वेळीं धक्काबुक्की होते. त्यावेळीं आपल्या मुलांना संभाळा व आपल्या खिसा पाकीटांवर लक्ष ठेवा.

७. श्रींचे ऑफीस शिवाय कोणत्याही इतर ठिकाणीं अगर कोणाच्या हातांत पैसे देऊं नका. धर्मकृत्य फक्त संस्थेमार्फत करावें.

८. श्रींचे ऑफीसांत धर्म कृत्याबद्दल पैसे दिले, तर त्याची पावती मागुन घ्या.

९. श्री साईबाबा संस्थानचा इतर ठिकाणीं श्री साईबाबांचे नांवावर चाललेल्या संस्थांशीं कांहींही संबंध नाहीं.

१०. श्रींचा कोणी शिष्य नाहीं, अगर वारसदार गादीवर बसलेला नाहीं अगर मध्यस्थी नाहीं. कोणी श्रींच्या पेहेरावासारखा पेहेराव केला म्हणून विश्वास ठेवून फसूं नका.

११. मार्गदर्शकाचें सोंग करून कांहीं अपरिचित माणसें, शिरडीचीं स्थळें दाखविण्यासाठीं ओळख करून घेतात. अशा माणसांवर विश्वास ठेवूं नका.

१२. श्रींचे नांवांवर कांहीं माणसें जंतरमंतर, धागादोरा करणारे मांत्रिक तांत्रिक म्हणून फिरत असतात, त्यांचेपासून सावध रहा.

१३. श्रींचे नांवांवर चालू असलेल्या साखळी पत्रांस महत्त्व देऊं नका.

१४. श्रींचे बाबतींत आधारभूत माहिती ऑफिसांत विचारावी. इतरांवर विश्वास ठेवूं नका.

१५. आपली कांहीं तक्रार असल्यास, मुद्दाम सोईसाठीं ठेवलेल्या नोंद पुस्तकांत नोंदवा. आपलें पूर्ण नांव व पूर्ण पत्ता नोंदविण्यास विसरू नका. शक्य झाल्यास तक्रारींची एक प्रत मुंबई कचेरीकडे पाठवावी.

---

# नामामृताचें महात्म्य

## एक सत्यकथा

श्रद्धायुक्त अंतःकरणानें व निष्ठापूर्वक भगवंताचें नांव पुन्हां पुन्हां घेत राहिल्यानें तुम्हांला कोणतीही व्याधि जडलेली असो, ती नाहींशी होते.

धन्वन्तरी महाशयांनींच सांगून टाकिलें आहे कीं—

**अच्युतानन्त गोविन्द नामोच्चारण भेषजात् ।**
**नश्यन्ति सकला रोगाः सत्यं सत्यं वदाम्यहम् ॥**

श्रद्धा पाहिजे हीच तर मोठ्यांत मोठी अडचण आहे. आपल्यापैकीं पुष्कळजण या वाणीवर विश्वासही ठेवायला तयार होणार नाहींत.

सुमारें पन्नास वर्षें वयाचे आमचे एक प्राध्यापक मित्र आहेत. त्यांचें नांव कशाला पाहिजे ! त्यांना शिकवण्या वगैरेमुळें प्राप्ति समाधानकारक आहे. त्यांना जडलें दारूचें व्यसन ! त्यापायीं बराचसा पैसा खर्च होऊं लागला. व्यसनी माणसाला एकट्यासाठींच नव्हे तर अनेक व्यसनी बंधूंनाही संभाळावें लागत असतें. त्याच्या जोडीला सिगारेटचेंही व्यसन हात धुवून मागें लागलें होतें. अशा स्थितींत दहा वर्षांचा कालावधि लोटला. दिवसें-दिवस प्रकृति खालावत चालली होती. शरिरांतील रक्ताला ओहोटी लागलेली होती. पोटांत रोगानें घर केलें. न केलें तरच नवल ! तो रोग उत्तरोत्तर वाढत चालला. तो वाढावयाचाच. शेवटीं त्या प्राध्यापकास इस्पितळांत आश्रय घ्यावा लागला. तेथें दीड दोन वर्षें यातना भोगीत घालवावीं लागलीं. रोग कांहीं केल्या बरा होण्याचा रंग दिसेना. त्यांची पचनक्रिया अगदींच बिघडलेली होती. कांहींएक पचेना. घरांतील मुलें, माणसें व पत्नी सारीं चिंता करीत होतीं. शेवटचा उपाय म्हणजे ऑपरेशन ! तेंही करून पहाण्यांत आलें. परंतु रोग्याच्या स्थितींत कांहीं एक पालट झाला नाहीं. किती हताश स्थिति झाली होती त्यांची !

**हा उपाय करून तर पहा !**

सुदैवानें कोणे एके दिवशीं त्यांच्या घरीं एका सज्जन गृहस्थाचें आगमन झालें. ते ईश्वर प्रेमी होते. भगवन्नामावर त्यांचा संपूर्ण विश्वास होता. त्यांना घरच्या मालकाची हताश स्थिति उमजून आली. ती ऐकून ते हताश झाले नाहींत. त्यांनीं घरांतील सर्वांना दिलासा दिला. म्हणाले, ' कांहीं चिंता करण्याचें कारण नाहीं. माझ्याजवळ ' रामबाण ' औषध आहे.

' अच्युतानन्त गोविन्द नामोच्चारण भेषजात् ।
नश्यन्ति सकला रोगाः सत्यं सत्यं वदाम्यहम् ॥ '

'या श्लोकावर व त्यांत सांगितलेल्या महान् तत्वावर संपूर्ण विश्वास ठेवा. तुम्हांला रामनामाशिवाय आतां दुसरें औषध नाहीं. सारे उपाय करून थकलांत ना ? मग मी सांगतों तो उपाय श्रद्धापूर्वक अंमलांत आणा. त्यांत खर्चवेंच कांहीं नाहीं. करून तर पहा!'

बोलतां बोलतां त्यांनीं आपल्याजवळच्या थैलींतून थोडासा अंगारा बाहेर काढिला व तो पाण्यांत कालवून त्या रोग्याला प्यायला दिला, व म्हणाले, 'यापुढें देवाचें नांव सकाळीं सतत दोन तास श्रद्धायुक्त अंतःकरणानें घेत जा, तसेंच सकाळ—संध्याकाळ कांहीं वेळ देवपूजनांत व नामस्मरणांत घालवीत जा. भगवान् तुमचा पाठिराखा होऊन तुम्हांला जडलेल्या व्याधींतून तोच तुमची सुटका घडवून आणील. त्याच्यासारखा धन्वंतरी या पृथ्वीच्या पाठीवर दुसरा कोणीहि मिळणार नाहीं. यापुढें दुसरें कांहींएक करूं नका. निश्चित व संपूर्ण विश्वासानें मी सांगतों, त्याप्रमाणें आचरण करा. तुम्हीं रोगमुक्त व्हाल!'

प्राध्यापक महाशय सारे उपाय करून थकून भागून गेले होते. त्यांच्यापुढें आतां दुसरा कोणताहि मार्ग राहिला नव्हता. त्यांनीं त्या सत्पुरुषानें सांगितलेला प्रयोग श्रद्धापूर्वक सुरू केला. लक्षसर्वस्व त्याच उपायाकडे लाविलें. दारू, सिगारेटला केव्हांहि शिवणार नाहीं अशी शपथ घेतली. रामकृष्णाशिवाय दुसरें त्यांना आठवेना. उठतां बसतां रामनाम किंवा हरेकृष्ण. भगवंताच्या नांवावर श्रद्धा बसत चालली.

एक आठवडा गेला; दुसराहि संपला. रोग्याच्या स्थितींत थोरपालट आढळून येऊं लागला. अशा स्थितींत सहा महिन्यांचा कालावधि लोटला. अन्नपचन होऊं लागलें. शरिरांत रक्तसंचय होऊं लागला. पोटांतील रोग आस्ते आस्ते हटण्याच्या व पलायन करण्याच्या मार्गास लागला.

प्राध्यापक होते ते! ते स्वतःशीं पृथक्करण करूं लागले. सद्भावना, सद्विचार यांचा आपल्या शरीराशीं निकट संबंध आहे. भाव तसा देव; त्याचप्रमाणें आपल्या भावनांचा शरीर प्रकृतीशीं अत्यंत निकट संबंध आहे. रामनाम घेत असतां अंतःकरणांत ज्या भावना जागृत होतात, त्या शरिराला पोषक व हितावह असतात. ती अमृतवल्ली आहे. भजन, पूजन, प्रार्थना या फार महत्वाच्या गोष्टी आहेत. त्यांच्यामागें श्रद्धेचें पाठबळ मात्र पाहिजे, म्हणजे मग त्यांचें फळ मोठें आश्चर्यकारक असतें. मनुष्याचा अंतरात्मा अत्यंत शक्तिसंपन्न आहे. आपण त्याचें सामर्थ्य ओळखलें पाहिजे. त्याच्या सभोंवार विशुद्ध, पवित्र वातावरण निर्माण केलें पाहिजे. भजन, पूजन व प्रार्थना केल्यानें ती गोष्ट साध्य होते.

**'हरे कृष्ण, हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे'**

साऱ्या आधिव्याधींचें हरण करणारें असें हें भगवन्नाम आहे, याबद्दल प्राध्यापक महाशयांची खात्री पटली.

आणि कां पडूं नये? अशा या कार्यक्रमांत एक वर्ष हां हां म्हणतां पार पडलें. केवढें स्थित्यंतर घडून आलें होतें या काळांत! एक वर्षानंतर त्यांना भेटण्यासाठीं गेलों असतां आमच्या मनाला आश्चर्याचा जबरदस्त धक्का बसला! त्यांच्या शरीर प्रकृतींत केवढा तरी थोरपालट घडून आलेला होता. रोग समूळ नष्ट झाला होता. चेहऱ्यावर प्रसन्नता दिसून येत होती. हा अतर्क्य थोरपालट कशामुळें घडून आला? असा आम्हीं प्रश्न करतांच प्राध्यापक महाशय म्हणाले, 'सकाळीं शौच मुखमार्जन व स्नान आटोपल्यानंतर मी देवपूजनाकडे वळतों. श्रीकृष्ण परमात्म्याचें एकसारखें चिंतन मनांत चालू असतें, त्यांत मला कल्पनांतीत आनंद वाटतो. त्या आनंदांत जास्तींत जास्त वेळ घालवावा असें वाटतें. जें जें कांहीं खातों, तें देवाचा प्रसाद म्हणून त्याचें नांव घेऊन खातों. प्रत्येक गोष्ट करतांना मला भगवंन्ताचें स्मरण होतें. सकाळप्रमाणें सायंकाळींही दीड दोन तास भजन, पूजन व चिंतन यांत घालवितों. गेल्या सबंध वर्षांत मी औषध कोणत्याही प्रकारचें घेतलें नाहीं. भगवंन्नाम हेंच माझें औषध. ज्याला आत्मशक्ति म्हणतात ती या एकंदर कार्यक्रमामुळें वाढत चालली आहे असा माझा अनुभव आहे. माझ्या मनांत अपवित्र विचार केव्हांही येत नाहींत. निराशा मला शिवत नाहीं. मन नेहमीं प्रसन्न असतें. आणि हें सारें स्थित्यंतर कशामुळें घडून आलें? भगवन्नामामुळें. तो माझा आधार; त्यानेंच माझा पुनर्जन्म झाला!"

### रामनामामुळें पुनर्जन्म

पहा बरें! देवाचें नांव हें किती फलदायक आहे! जेथें कोणतेंही औषध गुण देऊं शकत नाहीं, तेथें रामनाम तुमच्या मदतीला येतें व तुमचा उद्धार करतें, तुमचा पुनर्जन्म घडवून आणतें.

जेथें औषधोपचाराचा कांहीं एक उपयोग होत नाहीं, तेथें देवाचें नांव कल्पनातीत व आश्चर्यकारक चमत्कार घडवून आणतें. काय बरें याचें कारण असेल?

मनुष्यप्राणी म्हणजे कोण समजतां तुम्ही? हें दिसणारें शरीर म्हणजे मनुष्य? नाहीं. त्या शरिरांत आत्मारामाचें वास्तव्य आहे त्याची आहे का खबर तुम्हांला? त्या आत्मारामाची तुम्हांला आठवणही नसते. कर्ता करविता तो आत्माराम आहे. त्याला समाधानी व आनंदी ठेवलें पाहिजे. आम्हीं खातों, जेवतों किंवा व्यायामही घेतों. तेवढ्यावर आमचें शारीरिक स्वास्थ्य अवलंबून नाहीं. आमच्या मनांत जे विचार येतात, ज्या भावना जागृत होतात, त्यांवरही आमचें स्वास्थ्य अवलंबून आहे. आम्हीं आमचें आत्मबळही वाढविलें पाहिजे. त्यासाठीं पोषक अन्न घेतलें पाहिजे. देवाचें नांव श्रद्धेनें घेणें हेंच आत्मबळ वाढविण्याचें साधन. त्याचा शारीरिक आरोग्याशीं फार निकट संबंध आहे.

नीतिधर्मानें वागावयाचें तें कशासाठीं? त्यांत आपला मोठा स्वार्थ आहे. आत्मीक बळ त्यामुळें आपोआप वाढत जातें. आणि त्याचा परिणाम तुमचें शारीरिक सामर्थ्य वृद्धिंगत करण्यावरहि होत असतो. मनांत नेहमीं सद्विचार, सद्भावना वावरत असाव्यात. पापी,

* पांडुरंगाच्या व त्याच्या आईच्या वाट्याला जें भाग्य आलें तें सर्वांच्या वाट्याला येत नाहीं. त्याचें घर भगवन्नामानें सर्वकाळ दुमदुमून गेलेलें असे. *

# ध्यानीं मनीं देव

महाराष्ट्रांतील एका खेड्यांत रहाणाऱ्या एका आदर्श कुटुंबाची ही कहाणी आहे. त्या कुटुंबांत एकंदर माणसें होतीं चार. घरमालक, त्याची आई, पत्नी व एक लहान मुलगा. घरमालकाचें नांव होतें पांडुरंग. आणि ते परमभक्त होते पांडुरंगाचे. पांडुरंगाचे वडीलही परम देवभक्त होते. तेंच वळण चिरंजिवास लागलें होतें. आई तर काय, आपला बहुतेक वेळ ईश्वरचिंतनांत घालवीत असे. ध्यानींमनीं परमेश्वर. त्या उभयतांचा बहुतेक वेळ देवधर्म करण्यांत जात असे. पांडुरंग हें सर्व बालवयापासून निरीक्षण करीत असे. त्याच्या मनावर उत्कृष्ट संस्कार जडत गेले. वयोमानाबरोबर ते चिरस्थायी झाले.

**समाधान वृत्तीचा वरदहस्त**

या कुटुंबावर देवाची पूर्ण कृपा होती. खाण्याची पिण्याची ददात नव्हती. फारसे परिश्रम करावे लागत नसत. शिवाय असलेल्या स्थितींत समाधान मानून रहाण्याची वृत्ति सर्वांच्या अंगीं बाणलेली होती. कुटुंबांत समाधान वृत्तीची फार महति आहे; परंतु अनेक कुटुंबांतून नेमका त्याचाच अभाव आढळून येत असतो. घरांत समाधान नसलें, म्हणजे कितीही गडगज संपत्ति असली तरी तिचा काय बरें उपयोग ? पांडुरंगाच्या कुटुंबावर समाधानवृत्तीचा वरदहस्त होता. कारण त्याच्यावर देवाची कृपा होती.

पांडुरंगाला कशाचीही चिंता करण्याचें कारण नव्हतें. माता, पत्नी दोघेंही असलेल्यांत समाधान मानून आनंदानें कालक्रमण करीत होतीं. घरांतील संसाराचा भार त्याला भासत नसे. घरकाम करून राहील त्यावेळेचा सदुपयोग भजनपूजनांत व ईश्वर चिंतनांत

---

दुष्ट विचारांस मनांत केव्हांहि थारा देऊं नये. मन नेहमीं सत्कृत्यांत गुंतलेलें असावें. त्याचा आपल्या मनावर, मेंदूवर व डोक्यावर फार चांगला परिणाम घडून येत असतो. दुष्ट व पापी विचारांमुळें मन अस्वस्थ बनतें व मग नानाप्रकारचे रोग उद्भवूं लागतात.

यासाठीं देवाचें नांव घेणें, भजनपूजनांत रोजचा कांहीं वेळ दवडणें, अत्यंत हितकारी असतें. त्यामुळें आपल्या अंतःकरणांत दिव्यशक्ति निर्माण होऊं लागते. तें दिव्यत्व म्हणजेच तुम्हांला तारणारें, सर्व आधिव्याधींपासून तुमचें रक्षण करणारें अमृत होय. त्या अमृताची साधना करा म्हणजे या जगांत तुम्हांला कोणतीहि गोष्ट असाध्य वाटणार नाहीं.

घालवावयाचा, हा त्याचा नेहमींचा शिरस्ता होता. पांडुरंग शिकला सवरलेला होता. देवधर्माचे ग्रंथ मिळवून त्यांचें पठण करावयाचें व रात्रीच्या शांतवेळीं आईला व पत्नीला साधुसंतांच्या व देवदेवतांच्या रसाळ कथा मोठ्या आवडीनें सांगावयाच्या. किती मजेंत व आनंदांत जात असे तो वेळ! अशा रीतीनें दिवसांमागून दिवस व रात्रीमागून रात्री जात होत्या; आणि प्रती दिवशीं घरांतील सर्व माणसांच्या गांठीला पुण्यसंचय होत होता.

## पांडुरंगाची देवभक्त आई

पांडुरंगाच्या आईची सत्तरी उलटून आतां तर तिनें ऐशींच्या घरांत पदार्पण केलें होतें. फार जगणें झालें, अधिक जगून तरी काय करायचं आहे! नामसंकीर्तनांत ती आपला सारा वेळ घालवीत होती. आषाढी एकादशी अगदीं जवळ आली होती. तत्पूर्वी २–३ दिवस तिनें आपल्या मुलास व सूनबाईस प्रेमानें जवळ बोलाविलें व म्हणाली, ' माझ्या लाडक्यांनो, तुमच्या सहवासांत मी खूप सुख भोगलें. आतां मला भगवंताच्या सन्निध जायचें आहे. मला त्याच्या भेटीची रात्रंदिवस आंस लागून राहिली आहे. एकादशी दोन दिवसांवर आली आहे. त्याच दिवशीं मी तुमचा निरोप घेईन म्हणतें. माझी कोणतीही इच्छा राहिलेली नाहीं. मी समाधानपूर्वक तुमचा निरोप घेणार आहें. आतां राहिलेल्या २–३ दिवसांत अखंड हरिभजन व भगवंताचें नामसंकीर्तन चालू रहावें एवढीच माझी इच्छा आहे. '

## एकादशीच्या दिवशीं प्रयाण

पांडुरंगानें आईची इच्छा परिपूर्ण करण्याचा निर्धार केला. त्यानें गांवांतील चार हरिभक्त जमा केले व देव्हाऱ्यांतील देवासमोर अखंड नामसंकीर्तन वाद्यांच्या साथीसह चालविलें. रात्रंदिवस समया तेवत होत्या. धूप व उदबत्त्या सारख्या पेटत होत्या व सुगंधानें सारें वातावरण दुमदुमून गेलें.

एकादशीचा दिवस उजाडला. सकाळीं एक प्रहर उलटल्यानंतर पांडुरंगाच्या आईनें रामनाम म्हणत ' राम ' म्हटला. तिच्या देहांतील दिव्यज्योति भगवन्ताच्या तेजोवलयांत संमिलित झाली. म्हातारीच्या चेहऱ्यावर त्या प्रसंगीं दिव्य तेज झळकत होतें. प्रत्यक्ष भगवानच तिला नेण्यासाठीं आले असावेत असें सर्वांना वाटलें; कारण त्या परिसरांत क्षणभर प्रकाशच झळकत असल्याचा भास पांडुरंगाला झाला. तो जें कांहीं उमजायचें तें उमजला.

आईच्या देहांतील दिव्य प्राणज्योति तिला सोडून गेली तरी पांडुरंगानें नाम-संकीर्तन थांबविलें नाहीं. त्याच आईचा तो मुलगा होता. ' ऐसें भाग्य कधीं लाहता होईन! ' असें त्यावेळीं त्याला क्षणोक्षणीं वाटत होतें.

मातेनें मृत्यूवर जय मिळविला होता. ती अमर झाली होती. मलाही एक दिवस त्याच मार्गानें पांडुरंगाच्या भेटीसाठीं जावयाचें आहे, असें पांडुरंग स्वतःशीं म्हणत होता.

सत्पुरुषाचा सहवास पूर्वपुण्याईशिवाय वाट्यास येत नाहीं. तो ज्यांच्या वाट्यास आला ते धन्य होत. त्यांच्या जन्माचें सार्थक झालें म्हणून समजावें.

# सत्पुरुषाचा सहवास

**********************

सत्संगतीचा महिमा शब्दांनीं वर्णन करणें कठीण आहे. सत्संगतीमुळें आपलें सारें जीवन उजाळलें जातें. जीवनांतील काळोखी जाऊन तेथें प्रकाश दिसूं लागतो. हरिभजनाची गोडी उत्पन्न व्हायला सत्संगाची जरूर असते. उगाच भलत्यासलत्याला त्यांत गोडी वाटणार नाहीं. देवाच्या नांवाची गोडी अंतःकरणांत उत्पन्न झाल्याशिवाय तुमच्या मनांतील मोहपटल दूर होणार नाहीं व जोंपर्यंत तुम्हीं मोहाच्या तावडींतून सुटला नाहीं तोंपर्यंत ईश्वरावर तुमची भक्ति जडणार नाहीं.

जेथें निस्सीम प्रेम, निस्सीम श्रद्धा आहे, तेथें भगवंताच्या वाटेनें जाणें सुलभ होतें. प्रेमाशिवाय त्याची प्राप्ति होत नाहीं. आणि त्याच्या ठायीं प्रेम उत्पन्न व्हायला सत्संगतीची जरूरी असते. यासाठीं प्रत्येक मनुष्यानें सत्संग लाभावा यासाठीं डोळ्यांत तेल घालून जपलें पाहिजे. त्यासाठीं सतत धडपड चालविली पाहिजे. सत्संगतीचा लाभ नाहीं घडला तर सद् ग्रंथांच्या सहवासांत तरी राहिलें पाहिजे. स्वाध्यायाचें महत्त्वही फार आहे. तीही सत्संगतीच समजावयाची.

## सत्संगाचे चार प्रकार

सत्संगाचे चार प्रकार आहेत. सर्वांत श्रेष्ठ सत्संग म्हणजे परमात्म्याचा. त्याच्या ध्यानांत, चिंतनांत रहाणें. त्याच्या भेटीसाठीं अविरत तळमळणें व त्याच्च आनंदांत रहाणें यासारखें सर्वोत्तम सुख दुसरें कोणतें असणार ? सर्वश्रेष्ठ सत्पुरुष म्हणजे भगवंतच होय. त्याचा सहवास लाभल्यावर, त्यांतच गोडी वाटूं लागल्यावर आणखी काय पाहिजे ? त्यापुढें स्वर्गसुखही तुच्छ समजलें पाहिजे.

सत्संगाचा दुसरा प्रकार म्हणजे सत्पुरुषांचा, साधुसंतांचा. तिसऱ्या क्रमांकाचा सत्संग म्हणजे जे परमात्म्याच्या भेटीसाठीं सतत साधना करण्यांत गुंतले आहेत त्यांचा. आणि चौथ्या क्रमांकाचा सत्संग म्हणजे सद्ग्रंथ वाचन; स्वाध्याय हाच होय. सद्ग्रंथांचें श्रद्धापूर्वक वाचन, मनन व अनुशीलन अत्यंत फायदेशीर होत असतें.

पहिल्या प्रतीचा सत्संग हा भगवंताच्या कृपेशिवाय प्राप्त होत नाहीं. सारी धडपड व साधना करावयाची ती त्यासाठीं. त्याचप्रमाणें आपल्या आयुष्यांत सत्पुरुषाची भेट होऊन त्याचा सहवास लाभणें ही सुद्धां गोष्ट पूर्वपुण्याईशिवाय लाभास येणें कठीण आहे. **'बहुत सुकृताची जोडी । म्हणुनी विठ्ठल आवडी ॥ '**

## आपणासारिखे करिती तात्काळ

सत्पुरुषाचा सहवास लाभल्यावर आणखी दुसरें काय पाहिजे ? जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटका होण्याचा तो राजमार्ग आहे. सत्पुरुषाच्या सहवासामुळें होणाऱ्या

मौजेनें गप्पा मारीत असलों असलों तरी दृष्टांत द्यावयास अकल्पित साईकथाच मला आठवतात. कागद घेऊन लिहूं म्हटलें तरी शब्दांची जुळणीच होत नाहीं. परंतु साई जेव्हां मला लिहावयास लावतात, तेव्हां लिहितां लिहितां लिहिणें संपतच नाहीं. चुकून जर अहंकार मनांत शिरकाव करूं लागला तर साई आपल्या शक्तीनें तो ताबडतोब दडपून टाकून भक्तांना कृतार्थ करतात. भक्तानें काया वाचा मनें करून साईस लोटांगण घातलें म्हणजे त्यानें न मागतां देखील त्याला धर्मार्थ काम मोक्षाचा लाभ होतो. कर्म, ज्ञान, योग आणि भक्ति हे ईश्वरप्राप्तीचे चार मार्ग आहेत. हे जरी भिन्न असले तरी अखेर भक्ताला आपल्याच ध्येयाच्या ठिकाणीं घेऊन जातात. भक्ति ही जणूं काय बाभुळ वनांतील एक वाट असून पावलों पावलीं काट्याकुट्यांनीं, खांच खळग्यांनीं भरलेली बिकट अशी असली, तरी ती आपणांस हरिनिकटच नेऊन सोडते. कांटे टाळून जपून पाय टाकणें हाच एक सुलभ उपाय आहे. अशा रीतीनें मार्ग आक्रमण केल्यानें कोणतेंही भय न राहतां आपण सुखरूप हरिद्वारीं जाल असें साई माऊली सांगत आहे. मन पूर्णपणें भक्तिमय झालें म्हणजे वैराग्य आपोआपच आपल्याजवळ येतें. ज्ञान वाढतें, कैवल्य प्राप्ति होऊन चिर सुखाचा लाभ होतो.

मूळ परमात्मा स्वयंसिद्ध सच्चिदानंद स्वरूप त्रिगुण युक्त असतो. तो त्रिगुणांनीं जसा व्यक्त होत असतो, तशीच माया कार्यप्रवृत्त होऊन सत्व रज आणि तम यांना चालवून आपले गुण व्यक्त करीत असते. मृत्तिकेला विशिष्ट असा आकार दिला म्हणजे त्याला घट असें म्हणतात, परंतु घट फुटतांच नामरूप विकार सारेच लोप पावतात. दोघांचा परस्पर कार्यकारण भाव झाला म्हणजे मायेपासून हें अखिल जग होत असतें. माया मूर्तिमंत साकार होऊन या जगत्‌रूपानें प्रगट होत असते. विश्वोत्पत्ती आधीं माया व्यक्त नसून ती परमत्म् स्वरूपांत लीन होऊन राहिली होती म्हणजे तेथें ती अव्यक्तानें संचरलीं होती. परमात्मरूप व्यक्त झालें. तरी माया परमात्मरूपांत अव्यक्त असते. सारांश, ही माया परमात्मरूप असून परमात्मीं अभेदरूप अशी आहे. प्रथमतः मायेनें तमोगुणापासून चलनवलन शून्य, निर्जीव असे जड पदार्थ उत्पन्न केले. मग रजोगुणाच्या साहाय्यानें जीवसृष्टि निर्माण केली. पुढें सत्वगुणांच्या आधारें बुद्धितत्व निर्माण करून ज्ञानयुक्त जीवांची उत्पत्ति केली. येथेंच परम्यात्म्याच्या आनंदगुणाची मिसळणी होऊन या निर्मिती खेळाची पूर्णता होते. सारांश माया महाविकारी आहे. जोपर्यंत तिनें क्रियोपाधी न स्वीकारतां उपरोक्त पदार्थांची निर्मिति केली नाहीं, तोंपर्यंत हे त्रिगुण अव्यक्त असतात. गुणानुरूप मायेनें कांहीं कार्य केलें नाहीं तर ती व्यक्त होऊं शकत नाहीं. जणूं काय अक्रियत्व स्वीकारून ती अव्यक्त राहते. माया हें परम्यात्म्याचें कार्य असून जगत् हें मायेचें कार्य आहे. ' सर्वं खल्विदं ब्रह्म 'त्याचें ऐक्य हें ह्या तिघांचें कार्य होय. ही अभेद प्रतीति कशा रीतीनें निश्चितपणें होतें हें जाणून घेण्याची ज्यांच्या मनांत उत्कट इच्छा आहे त्यांनीं वेद, श्रुति पहाव्या. सारासार विचारशक्ति, वेदशास्त्र–श्रुति–स्मृति, गुरु, वेदांत वाक्य प्रतीति

हीं सर्व परमानंद प्राप्तीदायक आहेत. माझ्या भक्तांच्या घरीं अन्नवस्त्राची कधींच कमतरता असणार नाहीं अशी हमी श्रीसाई देत असत हें सर्वांस माहीत आहे. अनन्यपणें माझें भजन व नित्याभियुक्त मनें माझी सेवा जे करतात, त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था करणें माझें ब्रीद आहे, हें भगवद्गीता वचन प्रमाण मानण्यास श्रीसाई सांगत आहेत. असें केल्यानें अन्नवस्त्राची वाण पडणार नाहीं म्हणून त्यासाठीं प्राण वेचूं नका असें ते पुढें सांगत आहेत. देवाच्या दरबारीं मान व्हावा, याचना करावयाची असेल तर देवापुढेंच पदर पसरावा, कारण तोच एक दाता आहे. त्याचाच प्रसाद जोडावा आणि लौकिक मानाचा त्याग करावा. लोकांनीं मान डोलावून स्तुति केली म्हणजे भुलून जाऊं नये. आपल्या आराध्यदेवतेला आपली करुणा येऊन ती चित्तांत द्रवली पाहिजे व घामानें डबडबली पाहिजे. हेंच ध्येय सर्वांना गोड लागो. आपल्या सर्व इंद्रियांना भक्तीचें वेड लागलें पाहिजे. सर्व इंद्रियविकारांना भक्तीचे मोड फुटले पाहिजेत. आणखी काय हवें? सदैव माझें भजन घडूं द्या. कशाची आवड न वाटतां सर्व गोष्टींचा विसर पडून आपलें मन माझ्या नामस्मरणांत रत होऊं द्या. मग देह, गृह आणि संपत्ति यांचा विसर पडून चित्तास परमानंद होईल आणि मन समदर्शी, शांत, निश्चित होईल. चित्तांत समाधान असणें हीच सत्संग केल्याची खूण आहे. नाना ठिकाणीं मन बसत असलें तर त्यास ' तल्लीन म्हणावें काय ?

तरी श्रोतेहो, आतां पूर्ण अवधान देऊन श्रीसाईचरित निरूपण श्रवण करा व त्या योगें आपल्या हृदयांत भक्तीचा उदय होवो. ही कथा ऐकतांना आपणांस सुख लाभेल. आपलें चंचल मन शांत होऊन त्याची तळमळ नाहींशी होईल. आतां पूर्वकथानुसंधानाप्रमाणें रामजन्माचें कथाकीर्तन व मशीद जीर्णोद्धाराचें निरूपण सुरू करून कथानक पुढें चालवूं या.

गोपाळ गुंड नांवाचे बाबांचे एक भक्त होते. बाबांवर त्यांची अतिशय भक्ति, मुखांत अखंड बाबांचें नामस्मरण असे. अशा रीतीनें ते कालक्रमणा करीत होते. त्यांना मूल नव्हतें. पुढें श्रीसाईनाथांच्या कृपाप्रसादानें त्यांना मुलगा झाला. फारच आनंद झाला. एकदां त्यांच्या मनांत आलें कीं, शिरडीला प्रतिवर्षी एखादा उरूस किंवा यात्रा भरवावी म्हणजे त्यामुळें सर्वत्रांस आनंद वाटेल. तो विचार तात्या कोते, माधवराव वगैरे मंडळींना पटला आणि त्या दृष्टीनें हे सर्वजण तयारीला लागले. या उत्सवासाठीं एक निर्बंध म्हणजे जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी मिळणें आवश्यक होतें. याबाबतींत तेव्हां तेथें असलेल्या कुळकर्ण्यांकडून आडकाठी येऊन कार्यांत मोडता पडला. याचा परिणाम असा झाला कीं कलेक्टरनें शिरडीला जत्रा भरवूं नये असा हुकूम दिला. परंतु जत्रा भरविण्या-संबंधानें महाराजांचा पूर्ण आशीर्वाद होता. फार काय त्यांची तशी आज्ञाच होती. ग्रामस्थांनीं या गोष्टीचा पिच्छा पुरविला व फिरून जीवापाड प्रयत्न केले, अखेर अधिकाऱ्यानें हुकुम फिरवून सर्वांचा मान ठेवला. तेव्हांपासून बाबांच्या अनुमतीनें यात्रा

रामनवमीला ठेवली. तात्या कोते व्यवस्था पाहत असत. जत्राही फार मोठी जमत असे. तारो वाजंत्रांच्या घोषांत भजन पूजन समारंभासहित यात्रा पार पडत असे. याच दिवशीं दोन नव्या निशाणांची मोठ्या थाटानें मिरवणूक निघून मशीदींत जात असे. तेथें तीं मशीदीच्या दोन टोकांना बांधलीं जात असत.

पुढे या उरूसांतून रामनवमी उत्सव कसा उद्भवला हें नवलपूर्ण कथानक ऐका. हा उत्सव म्हणजे शिरडीचा गौरवच आहे. श. १८३३ मध्यें उरुसानिमित्त रामनवमी जन्मोत्सवही प्रथम सुरू झाला तेव्हांपासून तो अव्याहतपणें चालू आहे. सुप्रसिद्ध कृष्ण जागेश्वर भीष्म यांची कल्पना कीं रामजन्मोत्क्रम करावा. फार कल्याणकारक ठरेल. तोंपर्यंत या दिवशीं उरुस, यात्रा भरत असे, त्यांतच त्यावर्षी जन्मोत्सवास सुरवात झाली. भीष्म वाड्यामध्यें स्वस्थ बसले असतां काका पूजा साहित्य घेऊन मशिदींत जाण्याच्या तयारींत होते. साईदर्शनाची अंतरांत ओढ आणि उरुसाचीही मौज पहावयास मिळेल म्हणून काका उत्सवाच्या एक दिवस अगोदरच शिरडींत येऊन हजर राहत असत. योग्य समय पाहून भीष्मांनीं काकांना विचारलें. ' माझ्या मनांत एक उत्तम विचार आला आहे आपण मला मदत कराल कां ? रामनवमीच्या दिवशीं येथें यात्रा भरते. तेव्हां जन्मोत्सव सुद्धां साधावा असें मी म्हणतों. अनायासें उत्तम संधि आहे ही.' काकांना हा विचार ताबडतोब पसंत पडला. ते म्हणाले, " बाबांचा होकार मिळवा. त्यांच्या आशेवर सर्व कांहीं अवलंबून आहे. एकदां ' त्यांची परवानगी मिळाली कीं, मग कार्यास उशीर नाहीं. हो, पण जन्मासाठीं कीर्तनाची जरूरी आहे. आणि या खेडेगांवांत हरदास कोठून मिळणार ? ही एक मोठी अडचणच आहे. ' भीष्म म्हणतात, ' त्याची काळजी नको तुम्हांला, मी कीर्तनकार आहें. तुम्ही पेटीचा सूर धरा. राधा—कृष्णाबाई चांगला सुंठवडा तयार करतील वेळेवर. " यावर काका उत्तरले, मग चला कीं बाबांकडे, चांगल्या कार्याला उशीर कशाला. ' शुभस्य शिघ्रम् ' चला. आपण बाबांना विचारूं आणि कीर्तनासाठीं परवानगी मागूं या ? ' असें म्हणून ते दोघे मशिदींत आले. काका पूजेस सुरवात करतात तोंच बाबांनी काकांना वाड्यांत काय चाललें होतें, म्हणून विचारलें. काकांना कांहीं सुचेना. भीष्मांनाही दुसऱ्या रीतीनें बाबांनीं ताबडतोब विचारलें, ' बुवा काय म्हणतात ' म्हणून त्यांना पुसलें मग काकांना सर्व आठवलें आणि त्यांनीं आपला हेतु बाबांना कळविला. बाबांना ही कल्पना पटली आणि जन्मोत्सव करण्याचें निश्चित झालें.

[ अपूर्ण ]

# ॥ श्रीदत्त मानसपूजा ॥

****************************

केलें आवाहन, जेथें नाहीं विसर्जन । भरला ओतप्रत स्वामी माझा देवदत्त । गातां येत नाहीं, पूर्ण सुलीनता पाही । एका जनार्दनीं खूण विश्वीं भरला परिपूर्ण ॥१॥

**सहज :** सुखासनीं अनसुयानंदन, पाहतां हें ध्यान वृत्ति निवे । बालोन्मत पिशाच त्रिविध अवस्था धरी, आपण निराकारी सोहंभाव । कारण प्रकृति न घेन्वि तो माथां, चिदानंद सत्ता विलसे । एका जनार्दनीं हृदयीं आसन, अखंडित ध्यान निजतत्त्वीं ॥२॥

**अनन्य :** आवरी उदक निर्मळ, वासना सोज्ज्वळ नम्रपणें । प्रक्षाळिले पायवाही एक माथां, हृदयीं प्रीति धरितां प्रेमलाभ । घेऊनियां तीर्थ इंद्रियें तों धालीं, सकळ निवालीं जनार्दनीं ॥३॥

**चोहों :** देहांची क्रिया, अर्घ्य दिलें दत्तात्रेया । जें जें कर्म धर्म, शुद्ध सबळ अनुक्रम । इंद्रिया क्रिया, जात, कांहीं उचित अनुचित । आत्मा माझा देवदत्त, एकाजनार्दनीं स्वस्थ ॥४॥

**संचित** क्रियमाण, केलें सर्वांचें आचमन । प्रारब्ध शेष उरलें. यथा—तेथें ध्याऊं सद्गुरु दत्ता । झालें सकळ मंगल एका जनार्दनीं फळ ॥५॥

**स्नान :** भागीरथी सत्रावीची धार, सुभक्ति ते मकर समर्पिली । अर्पियलें स्नान झालें समाधान, मनाचें उन्मन होऊनियां । चित्त हें शितल गेली तळमळ, पाहिलें निर्मळ अमूर्तासीं । एका जनार्दनीं केला जयजयकार, अत्रीवरद थोर तिहीं लोकीं ॥ ६ ॥

**वर्णावर्ण :** नाहीं हेंचि प्रावर्ण त्याचें ठायीं । परा भक्तीच्या पालवीं, जवो—अज्ञाना मालवी । करा करा जन्मोद्धार, हरिभक्तीचा बडिवार । एका जनार्दनीं बोध, दत्ता पायीं तो स्वानंद ॥ ७ ॥

**गंध :** ग्रहण घ्राणता त्रिपुटी मांडिली सर्वैया । सुबुद्धि सुगंध चंदन, केलें दत्तात्रेया अर्पण । शांति क्षमा अक्षता तिलक रेखिला तत्त्वतां । एका जनार्दन करूनि साष्टांगें नमन ॥ ८ ॥

**सहस्रदल :** कमलाकर कंठीं अर्पियेले हार । सोळा बारा अठरा च्यार माथां वाहूं पुष्प भार । एका जनार्दनी अलिकुळु दत्त चरणाब्ज निर्मळु ॥ ९ ॥

**आत्मज्ञान :** वैश्वानरी, धूपजालिला सरोभरी । तेणें मातला परिमळ, पिंडब्रह्मांडीं सकल । वासाचा निजवास एका जनार्दनीं सुवास ॥ १० ॥

**ज्ञानदीपिका :** उजळी नाहीं चिंतेची काजळी । ओवाळीला देवदत्त प्रेमे आनंद भरीत । उष्ण चांदणें अतीत । तेज कोंदलें अद्‌भुत, भेदाभेद मावळले सर्व विकार गळाले । एका मिळावी जनार्दन तेजीं मिळाला आपण ॥ ११ ॥

**अहंममता :** घारीपुरी समूळ साधली दुरी। चतुर्विध केली ताटें मानी शरण गोमटे। मनपवन समर्पिलें, भोग्य भोक्तृत्व हारपलें। एका जनार्दनीं भोजन तृप्त झालें त्रिभुवन ॥ १२ ॥

**नाम :** मंगळामंगळ, झालें जन्माचें सफळ। दत्त जीवींचें जीवन, दत्त कारणाकारण। अनसुयात्मजा पाही, देहभान उरला नाहीं। एका जनार्दनीं दर्शन चित्त झालें समाधान ॥१३॥

**दत्त :** सबाह्य अंतरीं, दत्तात्रेय चराचरीं। दत्तात्रेयें माझें मन, हरोनि गेलें मी तूं पण। मुळीं सिंहाद्री पर्वतीं, दत्तात्रेयें केली वस्ती। भक्तां मनीं केला वास, एका जनार्दनीं विश्वास ॥ १४ ॥

**नाम :** निजभावें समर्थ, जेथें नाम तेथें दत्त। वाचे म्हणतां देव दत्त, दत्त करी गुणातीत। दत्त नामाचा सोहळा, धाक पडे कळिकाळा। दत्तनामाचा निजछंद, नामीं प्रगटे परमानंद। एका जनार्दनीं दत्त, सबाह्य स्वानंदें भरीत ॥ १५ ॥

---

# वर्गणीदारांस सूचना

श्रीसाईलीलेचा अंक न मिळाल्याबद्दल मधून मधून वर्गणीदारांच्या तक्रारी येत असतात. श्रीसाईलीलेचे अंक दर महिन्याच्या २० तारखेस वक्तशीरपणें पोष्टांत पडत असतात. तरी चार तारखेपर्यंत अंकाची वाट पाहून नंतर पोष्टांत चौकशी करण्यांत यावी. इतकेंहि करून अंक न मिळाल्यास श्रीसाईलीला कचेरीस कळविण्यांत यावें. वर्गणीदारांकडे अंक वक्तशीरपणें जावे याबाबतींत आमच्याकडून जास्तींत जास्त दक्षता बाळगिली जात असते. कांहीं ठराविक वर्गणीदारांकडून अंक न मिळाल्याबद्दल वर्षाकाठीं ५।६ वेळां तरी तक्रारी येतात. तरी अशा वर्गणीदारांनीं कृपा करून वरील सूचनेकडे जरूर लक्ष पुरवावें अशी विनंति आहे.

व्यवस्थापक : **श्रीसाईलीला**

श्री ज्ञानेश्वरी अनुवाद—

# जन्य जनक भावें । अध्यावो अध्यायातें प्रसवे

— ज्ञा. १८—७५

अनुवादक : **वि. पां. सातपुते**, मुंबई

नमो ज्ञानेश्वरा निष्कलंका । जयाची गीतेची वांचिता टीका ।
ज्ञान होय लोकां । अतिभाविकां ग्रंथार्थियां ॥

**— श्री एकनाथ महाराज**

श्रीमद्भगवद्गीतेच्या सोळाव्या अध्यायांतील 'तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते. . .या श्लोकावरील अध्यायांत, 'तैसा अशेषांही पुरुषार्था । जो गोसावी हो म्हणे पार्था । तेणें श्रुतिस्मृति माथां । वैसणे वापे ॥ शास्त्र म्हणेल जें सांडावे । तें राज्यही तृण मानावें । जे घेववी, तें न म्हणावे । विषयी विरु ॥ (ज्ञा. १७–४५९।६०), तसेंच, 'कार्याकार्य विवेकीं । शास्त्रेंचि करावीं पारखीं । अकृत्य तें कुडें लोकीं । वाळावें गा । मग कृत्यपणें खरें निगे । तें तुवां आपलेनि आंगें । आचरोनी आदरें चांगें सारावें गा ॥ (ज्ञा. १६–४६६।६७) अशा निश्चित शब्दांत कर्माचरणाच्या बाबतींत शास्त्रप्रामाण्याचा आदेश दिला आहे.

गीतेच्या सतराव्या अध्यायाचा प्रारंभ अर्जुनाच्या 'ये शास्त्रविधिमुत्सृज्य इ०...' या प्रश्नानें आहे. या प्रश्नाचें बीज, भगवंतांचा वरील सुकष्टाचरणीय दंडक व सामान्य जनाची त्याच्या पालनविषयक अपात्रता व असमर्थता यांतील तफावतीमुळें अर्जुनाच्या मनांत उमटलेले विचारतरंग, हें आहे. सोळाव्या व सतराव्या अध्यायांचा संबंध, सतरावा जन्य व सोळावा जनक अशा प्रकारचा आहे.

विषयाच्या ओघानें आलें म्हणून, सोळाव्या अध्यायांतील विषयांचे बीज नवव्या अध्यायांत आहे हें दोन्ही अध्यायांतील पुढील ओव्यांची कार्यकारणभावानें तुलना केल्यास स्पष्ट होईल. 'सहज इष्टानिष्ट करणी । दोघींचि इया कवतुकिणी । हे नवमाध्यायीं उभारणी । केली होती ॥ तेथ साउमा घेयावया उवावो । तंव ओढवला आन प्रस्तावो । तरी तया प्रसंगें आतां देवो । निरुपीत असे ॥ (ज्ञा. १६–६१/६२). व एवं तमाचिये पडिले गर्ते । न पविजतीचि विचाराचेनि हातें । हें असो तें गेले जेथें । तें शुद्धीचि नाहीं । म्हणोनि असोतु इयें वायाणीं । कायसीं मूर्खांचीं बोलणीं । वायां वाढवितां वाणी । शिणेल इन ॥ (ज्ञा. ९–१८५–८६). अस्तु.

वर म्हटल्याप्रमाणें भगवंतांस अभिप्रेत असलेलें शास्त्राचरण सामान्यजनांच्या आटोक्याबाहेरचें आहे, ही गोष्ट लक्षीं घेऊन, अशाच "मूर्ख मुमुक्षूं"ची बहुसंख्या समाजांत आहे त्यांची गति काय असा एक प्रश्न अर्जुनाच्या चित्तांत उभा राहिला. जे

समर्थ आहेत त्यांजबद्दल प्रश्नच नाहीं, परंतु असे फारच थोडे. असमर्थांचीच संख्या फार मोठी. तेव्हां या दुसऱ्या वर्गास तरणोपाय काय या विचारापोटीं सतराव्या अध्यायाच्या सुरवातीचा अर्जुनाचा प्रश्न आहे.

अर्जुनाच्या मनांतील विचारांची खळबळ, शास्त्राचरणांतील कठीणपणा व बहुसंख्यांची या बाबतींतील असमर्थता या सर्व गोष्टी ज्ञानेश्वरांनीं 'ये शास्त्रविधिमुत्सृज्य' या श्लोकावरील उपक्रमविषयक टीकेंत एका रूपकानें स्पष्ट केल्या आहेत. त्याचाच अनुवाद यापुढें यथामति केला आहे.

भगवंतांच्या आदेशाची सामान्यजनांकडून पालनाची अपेक्षा म्हणजे, अलंकार धारण करण्याची इच्छा असणाऱ्यानें सिंहाच्या नाकांतील केसांत तक्षकाच्या फडेंतील मणी ओवून, तोच लेइला पाहिजे असें म्हणण्यासारखें आहे, असें रूपकाचें सूत्र आहे.

सर्व गोष्टींचा साकल्यानें विचार करून अर्जुन मनांत म्हणतो.

'तेथ अर्जुन मानसें । म्हणे हें ऐसें कैसें ।
जें शास्त्रेंवांचूनि नसे । सुटिका कर्मी ॥
तरी तक्षकाची फडे । ठाकोनि कै तो मणि काढे ।
कें नाकींचा केशु जोडे । सिंहाचिये ॥
मग तेणें तो वोंविजे । तरीच लेणें पाविजे ।
येऱ्हवीं काय असिजे । रिक्त कंठीं ॥
तैसी शास्त्रांची मोकळी । या कैं कोण पां वेंटाळी ।
एकवाक्यतेच्या फळीं । पैसिजे कैं ॥
जाल्याही एकवाक्यता । कां लाभे वेळु अनुष्ठितां ।
कैंचा पैसारु जीविता । येतुलालिया ॥
आणि शास्त्रें अर्थें देशें काळें । यां चहूंही जे एकफळें ।
तो उपावो कें मिळे । आघवयांसी ॥
म्हणोनि शास्त्राचें घडतें । नोहे प्रकारें बहुतें ।
तरी मूर्खा मुमुक्षां येथें । काय गती पां ॥
हा पुसावया अभिप्रावो । जो अर्जुन करी प्रस्तावो ।
तो सतराविया ठावो । अध्याया येथ ॥

(ज्ञा. १७–२१–३०)

**अनुवाद**:—(भगवानांचा पूर्वोक्त आदेश लक्षांत घेऊन) अर्जुन मनांत म्हणत आहे, हें असें कसें व्हावें ? भगवंतांनीं तर शास्त्रप्रामाण्याशिवाय कर्माची सुटका नाहीं असें म्हटलें व बहुजन समाजास असें करणें शक्य नाहीं. तक्षकाच्या फडेपर्यंत प्रवेश मिळवून त्यांतील मणि हस्तगत कसा करावा, नंतर तो सिंहाच्या नाकांतील केसांत कसा ओंवावा व असा हा अलंकार सिद्ध झाल्यावर तो धारण करावा, नाहींतर काय

मोकळ्या गळ्यानेंच राहावें ? त्याचप्रमाणें अनंत विचारप्रणालींची अनंत शास्त्रें इतस्ततः असलेलीं, त्यांचीं आधीं मोट कशी बांधावी, त्यांचा सांगोपांग अभ्यास करून नंतर त्यांतील सिद्धांतांची एकवाक्यता कशी व्हावी ? बरें, जरी अशी एकवाक्यता कदाचित् शक्य झालीच तर त्याच टप्प्यापर्यंत जाण्यासाठीं पुष्कळसें आयुष्य व्यतीत झालें असल्यामुळें नंतर त्याच्या अनुष्ठानास पुरेसा वेळ मिळण्याइतकें मानवाचें आयुष्य दीर्घ नाहीं. आणि अपवाद म्हणून कदाचित् जरी एखाद्याला उदाहरणांत शास्त्र, अर्थ, देश व काळ या सर्वांचा समन्वय होऊन अनुष्ठान करणें जरी शक्य झालें, तरी हा उपाय किंवा ही अनुकूलता सर्वांस प्राप्त होण्यासारखी नाहीं. एकंदरींत काय कीं अनेक प्रकारें पाहतां भगवंतांचा कांटेकोर आचरणाचा दंडक बहुजनांस मानवण्यासारखा नाहीं, तेव्हां अशा 'मूर्ख मुमुक्षू'ची गति काय ? अशी शंका अर्जुनाच्या मनांत उत्पन्न झाली व तिच्या निरसनार्थ त्यानें 'ये शास्त्रविधिमुत्सृज्य...इ' प्रश्न केला. त्याच्या उत्तरादाखल भगवंतांनीं अर्जुनास जें सांगितलें तोच या सतराव्या अध्यायाचा विषय आहे.

'मूर्ख मुमुक्षु' यांतील 'मूर्ख' शब्दाचा अर्थ येथें निंदाव्यंजक नाहीं. 'मूर्ख' याचा पारिभाषिक अर्थ अज्ञानी, समजत नाहीं, परंतु समजून घेण्याची इच्छा व तळमळ ज्याला आहे, असा येथें घ्यावा. शास्त्रीय परिभाषेंत 'मूर्ख' व 'पामर' यांत भेद केला आहे. भर्तृहरीच्या नीतिशतकावरील वामनपंडितांच्या मराठी पद्यमय टीकेंत या दोन शब्दांच्या अर्थांतील फरक खालील श्लोकांत स्पष्ट केला आहे.

करूं ये समाधान जो **मूर्ख** त्याचें ।
धरूं ये सुखें चित्त पैं जाणत्याचें ।।
न जाणे न नेणे अशा **पामराला** ।
बुझावूं शकेना विधाता तयाला ।।

कविता सोपी व सर्वपरिचित असल्यामुळें स्पष्टीकरणाचें कारण नाहीं.

'मूर्ख, मुमुक्षू'चें स्पष्टीकरण सतराव्या अध्यायांतील पहिल्या श्लोकावरील ज्ञानेश्वरी टीकेंतहि आढळून येईल.

---

असें सांगतात कीं, सापाच्या विषापेक्षां जालीम वीष दुसरें कोणतेंही नाहीं; परंतु त्याहीपेक्षां जलाल वीष आहे तें मनुष्याच्या ठिकाणीं आहे आणि तें कोठें म्हणाल तर तें तुमच्या आमच्या जिभेच्या टोकाशीं असतें. विंचवाच्या नांगींत दुःसह वेग उत्पन्न करणारें वीष असतें. त्याहीपेक्षां जालीम वीष आपल्या जिव्हाग्रीं असतें. तें इतकें जालीम असूं शकतें कीं ते पृथ्वीचा प्रलय करून टाकूं शकेल; त्याच्या जालिमतेपुढें सर्पाच्या किंवा विंचवाच्या विषांस हात टेकावे लागतील.

—न्यायमूर्ती रानडे

# नीलवर्ण घनःश्याम

लेखक : केशवराव कृ. प्रधान B. A. L. L. B.

## प्रकरण २ रें

### बंदिखान्यांत जन्म व गोकुळीं प्रयाण

प्रकृतिबद्ध चराचराला ज्यास आपण जन्म व मृत्यु बोलतों त्या दोन्हीं स्थित्यंतरांतूनें जावेंच लागतें. चैतन्याला जडाचा अवलम्ब करावा लागतो. त्याला निर्मिती किंवा जन्म असें म्हणतात. मातीच्या कणाची स्थिति आपणास सदैव मृतवत् भासते. परन्तु त्यांत चाललेला चैतन्याचा कारभार आपल्या चर्मचक्षूंना दिसत नाहीं. खरोखरी मातीच्या कणांतील थर बरखालीं करणें, त्याच्यामधून खनिज तसेंच, वनस्पतीपोषक मूलद्रव्यें निर्माण करणें — तर कांही वेळा त्यामधून कीटक सृष्टिपोषक चळवळी करून चरसृष्टींत भर घालणें ही कामें त्या जडांतील चैतन्यच करीत असतें. खरं बोलायचें म्हणजे चैतन्य जडाला सोडून पूर्णपणें कधींहीं जातच नाहीं किंबहुना तें त्याला शक्यच नाहीं. कारण जड हीच चैतन्याची दुसरी स्थिति आहे. म्हणजे मृत्यु ही स्थिति वस्तूमात्रांनासुद्धां नाहीं. ( मृत्यु हा मानवांचा पारिभाषिक शब्द आहे. एवढेंच. ) तर ती मानवांना कोठून असणार ? परंतु मृत्यूचें भय मात्र चराचराला निश्चित वाटतें. याचें कारण एवढेंच कीं चैतन्यच आपल्या दोन्हीं अवस्थांतून स्वतःशींच विलास करीत असतें व या विलासाला रंग चढावा म्हणून दिवस रात्र प्रकाश, छाया, सुख दुःख, सत्य असत्य, सौंदर्य कुरूपता, धैर्य, भीति, मीलन, विरह या सर्व भावना आपल्याच ठिकाणीं कल्पून नाटकांत सहस्र सोंगें करणाऱ्या नटाप्रमाणें हावभाव करून दाखवित असतें.

जेथें मृत्यु नाहीं तेथें जन्म तरी कसला ? परंतु चैतन्य आपणच जड होऊन-आपणच त्यांतून युक्तीयुक्तीनें आपल्या मूळ स्वरूपाकडे येतें. यासच आपण जन्ममृत्यु, विश्व, उत्क्रांति वगैरे नांवें देतों. व त्यांतच निरनिराळ्या वस्तूंच्या स्थितींचा, मनांतील भावनांचा, बुद्धीचा, कौशल्याचा व अतींद्रिय योग समाधींचाही समावेश होतो. थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे चैतन्याचा जड बनण्याचा उद्योग व परत चैतन्य होण्याचा खटाटोप ह्या दोन्हीं क्रियांच्यामध्यें ब्रह्मांडांतील अणुरेणुंतील चाललेल्या अखिल चळवळीपासून तों तहत मानवांच्या हृदयांत निर्माण होणाऱ्या अतिसूक्ष्म—अतींद्रिय संस्कारांचा, भावनांचा, बुद्धिविलासाचा अंतर्भाव होतो. म्हणून जेव्हां जेव्हां चैतन्य स्वखुषीनें प्रकृतीची जाड्यता नाहींशी करून स्वतेजानें उजळून जाण्याची इच्छा करतें, त्याच वेळेला ज्यास आपण अवतार झाला—प्रभुजन्म झाला असें म्हणतों, अशी स्थिति प्राप्त होते. जे पिंडीं तें 'ब्रह्मांडीं', या न्यायानें-प्रभुजन्म ही व्यष्टि आणि समिष्टीची आपल्यांतील जडाचीं बंधनें सैल

करण्याची किंबहुना जड सालळ्या खळाखळ तोडून जडाच्या बंदिखान्यांतून चैतन्य स्वातंत्र्यांत पदार्पण करण्याची एक अपूर्व सुवर्णसंधीच असते. व्यक्तिगत जड हेंच मानवाचें तसेंच चराचराचें कर्म आहे. वस्तु प्राणिमात्रांत जेवढा जडाचा अंश असेल तेवढे त्याचें बंधन घट्ट वा सैल व तेवढा त्याच्यांतून चैतन्याचा आविष्कार होणें कठीण अथवा सुलभ असतें. जडता हेंच दुःख, चैतन्य हाच प्राणिमात्रांचा आनंद वस्तु प्राणिमात्रांतील जडता हेंच त्यांचें कर्म व चैतन्य अनुभूति हीच त्यांची मुक्ति.

आपण ज्या संस्कृति म्हणतों त्याचा सुद्धां अर्थ हाच आहे. जग आतां जास्त जास्त सुसंस्कृत होत चाललें असें म्हणणें म्हणजेच चराचरांतील जड अजडांतील—जडांश कमी कमी होत चालला आहे व त्यांतील चैतन्य जास्त जास्त स्पष्ट दृगोचर होत चाललें आहे असें म्हणणें.

मानवानें—विज्ञान शास्त्रानें मातीच्या कणांतील सुद्धां विद्युत शक्ती शोधून काढून उत्क्रान्त होत असलेल्या अगदीं खालच्या योनींना उत्क्रान्तिपथावर गति दिली आहे. खनिज सृष्टींतील तसेंच वनस्पति आणि प्राणी सृष्टींतील जडांतील चैतन्याला अधिक अविकृत करण्याची आपल्या संशोधन शक्तीनें जोराची चळवळ सुरू केली आहे. आपल्या लिखाणांतून मानवाच्या मनांतील भावना कल्पना ज्ञानलालसा ह्यास गती देऊन त्यांच्यातील चैतन्य जास्त जास्त मुक्त कसें होईल अशा तऱ्हेचें सर्वांगीण वाङ्मय निर्माण केलें आहे. विज्ञानानें स्वच्छ सूर्यप्रकाशांत सप्तरंग असून ते इन्द्रधनुष्यांत प्रतिबिम्बित होतात हें कधींच स्पष्ट केलें आहे.

**यथा प्रज्ञाहि संभवा**

चैतन्य म्हणजे तेज—तेव्हां प्रकृतीशीं संयोग करते—म्हणजे हवेंतील प्रकृतीच्या अणुरेणूशीं संलग्न होतें, तेव्हांच इन्द्रधनुष्याचा विलास आपल्या दृष्टीस पडतो. चैतन्यानें जडाशीं एकरूप होऊन हाच विलास करण्याचा सुंदर उपक्रम आरंभला आहे, असेंच हे विश्व पाहतांना आपणांस खरोखरी वाटावयास पाहिजे. आपल्या शरीरांतील जड आपल्यांतल्या चैतन्याशीं म्हणजे आत्म्याशीं ह्याच विलासाकरितां एकरूप झालें आहे. प्रकाश म्हणजे तेज सर्वव्यापी असल्यामुळें त्याच्यांत होणारी जडसंलग्नाची कोणतीही क्रिया, क्षणार्धांत अतिवाहक होते हें आतां Television नें सिद्ध केलें आहे. तसेंच ध्वनि म्हणजे चैतन्याचा जडाशीं संयोग होतांना उत्पन्न होणारी नादक्रिया सुद्धां क्षणार्धांत अतिवाहक होते हें Radio च्या शोधानें सिद्ध झालें आहे. तेव्हां ह्या विश्वांत होणाऱ्या अगदीं सूक्ष्माहून सूक्ष्म आणि मोठ्यांतल्या मोठ्या चैतन्यजड संलग्नाच्या क्रिया "अणोरअणीयात् महतोमहीयान्" असा आत्मस्वरूप मानवाच्या अंतरंगांत, प्रतिकृतींत होतात हे कांहीं मोठें आश्चर्य नाहीं. त्याची चालतीं बोलतीं उदाहरणें म्हणजेच आपले योगी आणि साधुसन्त होत. योगमार्गानें अतीमानव स्थितीकडे जाणाऱ्या व्यक्तीला स्वतांतील चैतन्य जास्त जास्त प्रतीत होऊं लागलें कीं जडबंधनें सैल होऊं लागतात व पूर्ण चैतन्यानुभव आल्यावर स्वेच्छेनें तें चैतन्य प्रकृतिधर्माप्रमाणें जगणाऱ्या शरीराशीं

ज्या ज्या संलग्नतेच्या वारंवार क्रिया करते—त्या सर्व क्रिया अशाच सर्वव्यापी सिद्धीचा त्यास अनुभव देतात. चैतन्य जडाचा अवलम्ब करून कांहीं वेळपर्यंत जडाच्या पूर्ण ताब्यांत जाऊन जडाच्याच सल्ल्यानें वागते—त्यास माणसाचें कर्म किंवा गति म्हणतात. ह्याच गतीवर माणसांचे निरनिराळे जन्म अवलंबून असतात. "अंतेमति सागतिः" किंवा "यथा प्रज्ञाःही संभवा" या वचनांचा तोच अर्थ आहे. जडाच्या ताब्यांत गेलेलें चैतन्य जड गति देईल तसा त्या ठिकाणीं जन्म घेतें व जडाच्या बंधनांत जाड्यामुळें दुःख सहन करते—त्याला सर्वसाधारण प्रकृति स्थिति किंवा मानवी जीवन असें म्हणतात. ह्या दुःखाच्याच अनुभवानें चैतन्य हळुहळू जागृत होऊन अतिमानव स्थितीकडे जाऊं लागलें म्हणजे जडाचा सर्व क्रियांवरील ताबा तें स्वतःकडे अधिकाधिक घेऊं लागतें व हा ताबा सर्वस्वीं आपल्याकडे घेतल्यावरच जडरहित म्हणजे कर्मरहित होऊन स्वेच्छेनें जन्म घेण्यास पात्र होते. स्वेच्छेनें जिवाचा जन्म ह्यास अवतार असें म्हणतात.

**श्रीकृष्णाच्या जन्मवेळीं**

श्रीकृष्णप्रभू जन्माला येतांना सर्व जड, अजड, या चैतन्यसम्राटासमोर लीन होऊन उभे राहिले. एखाद्या सार्वभौम महाराजांसमोर सर्व प्रजाजनांनीं, तसेंच मांडलिक राजांनीं नमावें—तशीच जरी ही परिस्थिती असली—तरीदेखील प्रभूजन्मांत वस्तु व प्राणीमात्र यांतील जडचैतन्य संलग्न समारंभ असल्यामुळें भीति—दुःख याचा काडीमात्र अंश नसतो. आणि म्हणूनच कृष्ण जन्मवेळीं सूर्योदयाबरोबर सूर्य कमलीनींनीं आपलें हृदय त्यास आनंदानें व स्व—खुषीनें अर्पण करावें किंवा चंद्रोदयाबरोबर सागरानें उत्फुल्ल होऊन आकाशाला भिडावें त्याप्रमाणे सर्व वस्तु प्राणिमात्रांत चैतन्याची अशी एक जोराची उत्सर्ग लाट निर्माण झाली कीं पृथ्वी स्वर्गाला आपल्या सहस्र बाहुकरांत् पकडून अतीव प्रेमानें घट्ट मिठी मारण्यास पहात आहे कीं काय असें वाटलें. दुष्टांच्या हृदयांत मात्र निसर्गाच्या या आनंद समारंभाचे रूपान्तर रौद्रतांडवांतच झालें. व गर्भगळित झाल्यामुळें थरकांप होऊन त्यांचे सर्व अवयव लटलट कांपूं लागले. सहस्र लांब जिभा असलेल्या राक्षसानें सर्वस्व मटकावण्यासाठीं त्या बाहेर काढाव्या त्या प्रमाणें आकाशांत विजांचा प्रचंड गडगडाट होऊन त्या पृथ्वीचें भक्षण करण्यास पाहूं लागल्या. एका एकीं झंजावात होऊन मोठें वादळ निर्माण झालें, मेघ गडगडून पर्जन्यवृष्टीच्या जलधारा प्रचंड वेगानें पृथ्वीतलावर टाकून तिला सचैल स्नान घालूं लागल्या. यमुना नदी दुथडी भरून वाहूं लागली व तिच्या पाण्यानें भोवतालच्या लहान ओढ्यांना भरती आल्यामुळें सर्वच प्रान्त जलमय दिसूं लागला.

**घनश्याम जन्माला आला**

सत्व, रज, तम या त्रिगुणांचा राजा श्रीकृष्ण आपल्या तपोमायेनें सर्व विश्वाला गुरफटून — सत्त्वशाली वसुदेव देवकिला मात्र आपल्या चैतन्य प्रभावानें जागृत ठेऊन एका निमिषांत सर्वांगसुंदर विश्वमांगल्य श्यामल बालकाच्या रूपांत, कंसाच्या बंदीखान्यांत प्रकट झाला. देवकी प्रसूत झाली व ती बंदीशाळा एका दिव्य

निळ्या प्रकाशानें कोना कोपऱ्यासह भरून गेली. नीलवर्ण घनश्याम जन्माला आला व त्या बंदीखान्यांभोवतीं विशाल स्वरुप धारण करून त्याचे प्रभावी सुदर्शनचक्र थेट आकाशापर्यंन्त गरगर फिरूं लागलें. तें सुंदर सुदर्शन चक्र कित्येक योजनें दूर असलेल्या ऋषीमुनींना दिव्यदृष्टीनें दिसलें. व ज्या मंगल क्षणाची ते आज कित्येक वर्षे अगदीं आतुरतेनें वाट पहात होते तो क्षण शेवटीं प्रत्यक्षांत अवतरला म्हणून ते शब्दशः प्रभो! प्रभो!! असे गहिंवरलेले उद्गार काढीत आनंदानें नाचूं लागले!

परमेश्वराचे सर्वच अवतार पूर्वेकडे झाले आहेत. अगदीं भगवान येशू ख्रिस्ताचा अवतार सुद्धां पूर्वेकडेच झाला. त्या वेळेलासुद्धां 'A Star in the East' या नांवानें प्रसिद्ध असलेला तारा येशू ज्या तबेल्यांत जन्माला आला त्याच्यावर चमकूं लागला व दिव्यदृष्टी प्राप्त झालेला ऋषीमुनींचा एक तांडा त्या ताऱ्यांच्या दिशेनें त्या बालकाचा शोध करीत करीत त्या ठिकाणीं प्राप्त झाला, असा उल्लेख येशू ख्रिस्ताच्या चरित्रांत सांपडतो. श्रीकृष्ण जन्म झाल्याची वदंता जणूं कांहीं ताबडतोब आपल्यालाच मिळाली असें वाटून पृथ्वीवरील सर्व अणुरेणु झाडें झुडपें, पशुपक्षी आणि माणसें निद्रावस्थेंतच अगदीं मांगल्यपूर्ण स्वप्न बघितल्यामुळें स्वतःशींच दिव्य अनुभूती येऊन गोड स्मित करूं लागलीं.

## जगाचा महान मंगल ठेवा

पृथ्वीतलावर सर्व ब्रह्मांडाचें मांगल्य आतां एकवटून अवतरलें होतें सर्व अणु-रेणूंतलें चैतन्य कंसाच्या बंदीखान्यांत गोंडस बालकाचें रूप घेऊन मंदस्मित करीत आपले पराक्रमी पण नाजूक हातपाय वरखालीं करीत होतें. त्याचे कुरळ कुन्तल, यमुना नदीच्या वळणावळणा बरोबर स्पर्धा करीत होते. तर त्याचा विशाल भालप्रदेश नील आकाशांत एकाच ठिकाणीं चंद्र, तारांगणें व नक्षत्रें यांनी एकच गर्दी करावी तसा चमकत होता. त्याच्या दोन्दी नयनांतील टपोरीं नीलवर्ण कमलें अनादि व अनंत काला-पासून लिहिलेला व न लिहिलेला विश्वाचा इतिहास, भूत, वर्तमान व भविष्य या त्रिदलांनी बोलका करूं लागली, व त्यांच्या नाजूक कडा विविध अंतःकरणांना आतांपर्यंत झालेल्या दुःखामुळें पाणावूं लागल्या. त्या सशक्त, गुटगुटीत जन्मतःच जावळ धरलेल्या ह्या शूर बालकाचें विशाल वक्षस्थळ 'दुष्टानी जगांवर केलेला अन्याय आतां एका क्षणांत नाहींसा करूं की काय' या उत्स्फूर्त भावनेनें वर खालीं होऊं लागले. व त्याचे पराक्रमी बाहू आपलें बल दाखविण्यासाठीं स्फुरूं लागले. निसर्गाचा राजा बंदीखान्याभोवतालच्या यमुना नदीनें पवित्र केलेल्या मोकळ्या सृष्टीला भेटण्यासाठीं कीं काय वसुदेवाच्या गळ्याला लाडीकपणानें मिठी मारून आपल्या विशाल नेत्रानें देवकीमातेला प्रेमानें न्याहाळीत आपली सुंदर पदकमलें तुरुंगाच्या दरवाजाकडे हालवून–मला ताबडतोब बाहेर घेऊन चला–असें खुणावूं लागला व त्याच्या बालमनांतील आशय वसुदेव देवकीनें ताबडतोब ओळखला. एकच क्षण देवकी मातेनें जगद्गुरूना जन्मदात्रीच्या वेड्या प्रेमाणें मिठी मारली व त्या परब्रह्म साकार स्वरूपाचें, अखिल योगेश्वराच्या समाधि-

सुख लालसेनें गोड चुंबन घेतलें, व जगाचा हा महान् मंगल ठेवा जगाला देण्यासाठीं वसुदेवाच्या स्वाधीन केला. व तो घेऊन वसुदेव निःशंक मनानें बंदीखान्याच्या क्रूर भयानक दरवाज्याकडे पावलें टाकूं लागला.

## यमुनेच्या मार्गानें वाटचाल

प्रकृतिप्रभु श्रीकृष्ण आपल्याच दिशेनें येत आहेत असें बघितल्याबरोबर बंदिखान्यांच्या लोखंडी गजांगजांतून चैतन्याची अशी कांहीं विद्युत् संवेदना फिरूं लागली कीं, त्या संवेदनेबरोबर बंदिखान्याचीं सर्व प्रचंड कुलुपें प्रभुचरणांना वंदन करण्यासाठींच कीं काय ताबडतोब लीन होऊन भूमीवर पडलीं. वसुदेवाच्या हातापायांत ज्या थोड्या लोहशृंखला राहिल्या होत्या त्याहीसुद्धां खळकन् भूमीवर पडून याच प्रमाणांत त्यांनीं सुद्धां आपला प्रणाम प्रभुपदीं सादर केला व त्या बंदिखान्या-बाहेर पडून वसुदेव झपाझप पाऊलें टाकीत यमुना नदीकडे चालू लागला. यमुना नदीच्या वाळवंटांत गंभीर शांतता पसरली होती. वर आकाशांत काळ्याकुट्ट ढगांनी अगदी एकच दाटी केली होती. तरी देखील प्रभुदर्शनासाठीं उत्सुक झाल्यामुळें चंद्र आपल्या तारांगण नक्षत्रांसहीत त्या ढगांच्या सीमारेषा रुपेरी करून वसुदेवाला मार्ग निदर्शन करूं लागला. भोंवतालची वनश्री प्रभु दर्शनासाठी उतावळी झाल्यामुळें झाडेंझुडपें हालून आनंदानें आपल्या माना शक्य तितक्या उंचावूं लागलीं. यमुना नदी तर आनंदानें इतकी बहरून गेली कीं आपल्या जलांग उपांगांनीं प्रभूला कवटाळण्यासाठीं आपले जलतरंग आकाशाला भिडले तरी बेहेत्तर अशा इर्षेनें महापुराचें स्वरूप धारण करण्यास पाहूं लागली. तथापि प्रभूचे चरण लागतांच प्रभूच्या मनांतील आशय ओळखून दुभंग पावली. व वसुदेव त्या जलौघामधून तयार झालेल्या मार्गानें गोकुळाचा रस्ता चालूं लागला. इतक्यांत प्रभु स्पर्शनाच्या तीव्र इच्छेनें काळे मेघ प्रभूवर जलसिंचन करूं लागले. हें पाहाताच यमुनेच्या तीरावरील प्रचंड तमालवृक्षाच्या पर्णांनीं वायूच्या सहाय्यानें प्रभूंचें कोमल सुकुमार शरीर भिजूं नये म्हणून-तुटून वाहात येऊन झाकण्याचा उपक्रम चालू सुरू केला. परन्तु कोणालाच व्यर्थ श्रम होऊं नयेत म्हणूनच कीं काय यमुनेच्या डोहांत वास्तव्य करणाऱ्या नागराज वासुकानें एकदम यमुनच्या जलांतून वर येऊन प्रभूवर त्यानें आपली पांचमुखी फणा धरली. वसुदेव यमुनेच्या परतीरावर येतांच -दुभंग झालेला यमुनेचा जलौघ पुन्हा अखंड झाला. वसुदेवाच्या पवित्र चरणस्पर्शानें गोकुळची भूमि अतिशय मंगल झाली.

## श्रीकृष्णाचें गोकुळांत आगमन

वसुदेवानें जेव्हां यमुना नदी ओलांडून गोकुळांत पदार्पण केलें तेव्हां सर्व " गोकुळ " निद्रावस्थेंत होतें. एखाद्या लावण्यवती स्त्रीनें तलम झिळमिळीत वस्त्रानें आपलें सर्वांग अगदीं लपेटून घेऊन गाढ निद्रेंत पहुडावें, त्याप्रमाणें अति विरल अशा धुक्यानें गोकुळांतील सर्व वनश्री, वाकण घेणारे लहान लहान रस्ते व पाय-वाटा व त्याच्या बाजूला वसलेलीं तीं छोटीं छोटीं झोंपडीवजा पण टुमदार घरें अर्धवट

झांकून गेलीं होतीं. कांहीं ठिकाणीं रामप्रहाराची वाट पाहात तेवत असलेल्या गवळ्यांच्या घरांतल्या दिवट्या आतां मंद मंद परंतु फिकट प्रकाशानें डोळ्यांवर झांपड आल्या-सारख्या निस्तेज जळत होत्या. अर्धवट पहांट व अर्धवट रात्र अशा या प्रहराला शीतल वाऱ्यामुळें गोकुळांतली सर्वच सृष्टि गोड गुलाबी स्वप्नाच्या तंद्रींत होती. जणूं कांहीं आतां लवकरच त्यांच्या सर्व आशा आकांक्षा अगदीं पुऱ्या होण्याची वेळ झपाझप पावलें टाकीत त्यांच्याच दिशेनें चालत येत होती—आणि यांत खोटें तरी काय होतें! अखिल विश्वाच्या स्वप्नाचें स्वप्न, अखिल ब्रह्मांडाचें कल्पनारम्य चिदानंद स्वरूप, एका गोंडस बालका रूपानें वसुदेवाच्या विशालच्या बाहूंतून, गोकुळाकडे आपल्या जगद्प्रभू नेत्रानें डोकावून पाहात झपाझप गोकुळाच्या हृदयांत शिरत होते. हा गोकुळींचा चिमणा राजा आज आपल्या लाडक्या गोकुळांत प्रथमच प्रवेश करीत होता. याच गोकुळांत त्याच्या मधूर बांसरीचे सूर अणुरेणूंच्या शरीरांत गोड संगीत निर्माण करणार होते. त्या मधुर सुरांच्या तालावर याच गोकुळांतले दगड, झाडेंझुडपें, पक्षी व पशूजीवन नृत्यकला आत्म-सात् करून ब्रह्मानंदीं विलीन होणार होते. याच मधुर स्वरांच्या वेड्या नादानें गोकुळीच्या गौळणी यमुना तीरावरील जलभरणाचीं ठिकाणें भूलून जाऊन—सर्व वृंदावनांत मोहन श्याम तान्हुला अशा प्रेमविव्हल हांका मारीत वणवण फिरणार होत्या. येथील नील आकाश—जल विरहीत शुभ्र ढगांची वरखालीं हालचाल करतांना—आपला नीलवर्ण याच नीलवर्ण घनश्यामाच्या वर्णाशीं जुळवून पहाणार होते. येथील सुवर्ण पिसांचे निळे निळे मयूर याच घनश्यामाबरोबर येथें नृत्य करणार होते; घुमघुम करणारे येथले निळे पारवे आपल्या नीलनयनांनीं एक पाय वर घेऊन—स्तब्ध होऊन वाकड्या मानेनें याच घनश्यामाच्या नीलवर्ण स्वरूपाचें आकंठ पान करणारे होते. थोडक्यांत काय कीं—अखिल ब्रह्मांडाच्या उत्पत्ति, स्थिती—लय या सर्व अवस्था ब्रह्मांड नायकाच्या या गोकुल निवासांत—आजूबाजूच्या सर्व अणूरेणूनां सुद्धां विदीत होणार होत्या; मग पशुपक्षी माणसें यांची तर गोष्टच वेगळी.

---

त्याग व ध्यान धारणा हीं दोन चाकें आहेत. या चाकांच्या सहाय्यानें चालणाऱ्या रथावर आरूढ होऊन योगी आगेकूच करीत असतो व त्यांच्याच सहाय्यानें तो देवत्व संपादन करीत असतो.

ज्यानें अध्यात्मिक जीवनाचा मार्ग स्वीकारला त्याची खूण म्हणजे नम्रता. 'नम्र झाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता.'

इंद्रिय दमन करण्यासाठीं झटा. आत्म संयमन करण्याकडे सारें लक्ष पुरवा. परमात्म्यावर सारें लक्ष केंद्रित करा. म्हणजे तुम्हांला आत्मप्रचीति होईल.

—स्वामी शिवानंद

---

# ॐकारार्पण !

हृदय-तरूच्या कल्पपल्लवींत भावसुमन हें गुंफावें !—
  तोच गुच्छ जणुं 'काव्यकुंज' भो, 'ॐकारार्पण' मन घ्यावें ॥ १ ॥
भगवंतानें मनुष्यप्राण्यां बुद्धीची संपदा दिली
  पुरुषार्थाच्या विभवास्तव 'ती' मनुष्यमात्रें आचरिली ॥ २ ॥
विचार तैसा आचार व्हावा ! उच्चारहि तद्‌रूप असो
  मनीं वचननिष्ठता असावी, 'रामनाम' तें मुखिं वसो ॥ ३ ॥
आई, बाप, गुरु देव, राष्ट्र-प्रीत, धर्मप्रेम पण निःशंक
  मानवनिष्ठा तशी प्रेममूल सदा असूं दे आवश्यक ॥ ४ ॥
नव्या मनुने सृष्टि निर्मिली, मानव निसर्गप्रिय झाला
  'देव निसर्गीं रमतो' वदती कविजन वाङ्मयरसिकाला ॥ ५ ॥
सत्व रज आणि तमगुण यांचा अंश शरीरीं असणार !
  पृथ्वी, आप, नभ, वात, तेजमय माती मातींत मिळणार ॥ ६ ॥
अंतीं कीर्ति शिल्लक असते, 'मूर्ति गुणांची मनिं ठसते
  प्रतिमादर्शन झालें तरीहि भावप्रतिभा तळमळते ॥ ७ ॥
वयमानानें ज्ञान वाढतें विकसित होते प्रवृत्ति !
  अनुवंशिकता सार्थ परंतु सत्संगत ही सुसंस्कृती ॥ ८ ॥
धन जमवावें, तन कमवावें, तसेंच मनहि जमवावें
  नीति, प्रीति आणि कृति वसावी, स्वार्थ-परार्थी साधावें ॥ ९ ॥
बहुरंगी, बहुढंगी दुनिया-'ब्रह्मरूप' तें ब्रह्मयाचें
  विविधतेंत एकता लाभण्या 'तन्मयता' साधन त्याचें ॥१०॥
देवानें निर्मिलें सर्व तें मानव सारें उपभोगी
  प्रयत्न, श्रद्धा तशी चिकाटी साधकांस हो उपयोगी ॥११॥
साहस, विद्या, शील, संस्कृति, रसाळ वाणी हीं रत्नें
  मानव्याचीं सत्यभूषणें गांठो मानव बहुयत्नें ॥१२॥

कवि : बाळासाहेब तळवाडकर

# 'भूतांची दया हें भांडवल संतां'

महाराष्ट्रांत जे थोर संत होऊन गेले, त्यांत श्रीएकनाथ महाराजांची थोरवी निराळीच. ते इतके परमार्थसंपन्न होते तरी त्यांचा गृहस्थाश्रम देखील कित्ता घेण्यासारखा होता. त्यांच्यासारखा आदर्श संसारी संत झाला नाहीं असें म्हटलें तरी त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. 'हें विश्वचि माझें घर' ही त्यांची वृत्ति. प्रत्येक प्राणिमात्राबद्दल त्यांना प्रेम, आदर, कळकळ आणि सहानुभूति वाटत असे व त्यांचा उद्धार करण्यासाठीं ते सदैव तत्पर असत. पैठणच्या ब्रह्मवृंदांनीं त्यांचा छळ केला व त्यांना दुरुत्तरें केलीं तरी देखील नाथांनीं त्यांना केव्हांहि उलट उत्तरें दिलीं नाहींत. वरील सदुक्तीची यथार्थता त्यांच्या ठायीं अगदीं पूर्णत्वानें झाली होती. प्राणिमात्रावर दया करणें हेंच त्यांचे जीवनव्रत आणि याविषयीं त्यांच्याबद्दलच्या प्रसिद्ध असलेल्या आख्यायिकाहि फारच उद्‌बोधक आहेत.

पैठणांतील एका अंत्यजाला चौर्यकर्माबद्दल अनेक वर्षें कारागृहांत शृंखलाबद्ध करून ठेवण्यांत आलें होतें. पोटभर अन्न न मिळाल्यानें तो कृश होऊन आसन्नमरण झाला होता. पुढें त्याच्या बेड्या काढून त्याला तुरुंगा बाहेरील मोकळ्या जागेंत ठेवण्यांत आलें. आपल्यावर पहारा नाहीं हें पाहून एके दिवशीं त्यानें पळून जाण्याचा प्रयत्न केला परंतु शारीरिक दुर्बलतेमुळें त्यास बिलकुल हालचाल करतां येईना. इतक्यांत हरिनामाचा गजर त्याच्या कानीं पडला. तो तसाच लोळत लोळत जिकडून कीर्तनाचा ध्वनि येत होता त्या ठिकाणीं गेला व धप्कन् बसला. तें नाथांचें घर होतें. नाथांच्या कीर्तनांत स्पृश्यास्पृश्य भेद नसल्यामुळें कोणी कोठेंही बसला तरी त्याला प्रतिबंध नसे. कीर्तन संपल्यानंतर श्रोते निघून गेले, व कांहीं वेळानें वाड्यांतली मंडळीहि झोपी गेली. खुद्द नाथ आपल्या आसनावर स्वस्थ बसून होते. त्यांची दृष्टी सहज त्या अनामिकाकडे गेली. अत्यंत दयार्द्र चित्तानें ते त्याच्याकडे गेले आणि म्हणाले, 'बाबा, तुला कोणत्या गोष्टीची अपेक्षा आहे तें कृपा करून सांग.' परंतु अगदीं आसन्नमरण झालेल्या त्या अंत्यजास आपलें मनोगत बोलून दाखवितां येईना. त्यानें खुणेनेंच आपण क्षुधित असून आपणांस अन्न पाहिजे असें कळविलें. नाथांनीं ताबडतोब स्वयंपाक करवून घेऊन त्याच्याकडून मिताहार करविला. अन्न पोटांत जातांच त्या अनामिकास हुषारी वाटून तो म्हणाला, 'महाराज ! मरूं घातलेल्या मला आज आपण खरोखरच जीवदान दिलें.' इतकें बोलून आपली सर्व हकीकत त्यानें नाथास सांगितली. नंतर नाथांनी त्यास वस्त्रें देऊन त्याची पूर्ववत् शक्ति परत येईपर्यंत त्यास तेथेंच राहण्याची आज्ञा केली. दुसरे दिवशीं नाथांनीं त्या अनामिकास आपल्या घरीं ठेवून घेतल्याचें तुरुंगाधिकाऱ्यास कळविलें. अशा रीतीनें सरकारी कायद्याचाही बोज राखून त्या गरीब अनामिकाचे प्राण नाथांनीं वाचविले. याबद्दल नाथांना जें पुण्य लाभलें

तेंच मागून घेऊन तेथेंच गंगेच्या कांठीं अश्वत्थ वृक्षावर राहत असलेल्या ब्रह्मराक्षसानें वेळ येतांच नाथाकरवीं आपला उद्धार करून घेतला.

एके दिवशीं नाथ गंगेवर स्नान करून परत येत असतां एक अंत्यज स्त्री घागर घेऊन घाईघाईनें गंगेवर पाण्यास गेली. मागून तिचें लहान मूल रडत रडत येऊं लागलें. परंतु उन्हानें वाळू फार तापलेली असल्यामुळें, त्याच्या पायास चटके बसूं लागले व तें तेथेंच वाळूंत तळमळत पडलें. त्याची ती करुणामय स्थिति पाहून नाथांचें कोमल हृदय द्रवलें. धांवत जाऊन त्यांनीं त्या मुलास आपल्या खांद्यावर उचलून घेऊन त्यास विचारलें, "बाळ, तूं कोणाचा ? तुझें घर कोठें आहे ?" त्या मुलानें खुणेनें आपलें घर दाखविलें. नाथ त्यास घेऊन तेथें गेले. त्याच्या घरीं गेल्यावर नाथांच्या ध्यानांत आलें कीं, हें पोर अनामिकाचें आहे. परत गंगेवर जाऊन त्यांनीं सचैल स्नान केलें व घरीं येऊन नित्य नैमित्तिक कर्म संपादिलें. हा प्रकार कोणाच्याही पाहण्यांत आला नाहीं. पुढें अशी मौज झाली कीं, श्री. त्र्यंबकेश्वराच्या दृष्टांतानें एक कुष्टरोगी ब्राह्मण नाथांकडे येऊन या सत्कृत्याबद्दल त्यांना प्राप्त झालेलें पुण्य आपल्या रोगपरिहारार्थ त्यांच्याकडून त्यानें मागून घेतलें. तेव्हां कोठें लोकांना ही गोष्ट समजली. व त्यांना मोठें आश्चर्य वाटलें. तथापि नाथ त्या ब्राह्मणास म्हणाले, "भटजी, पापपुण्याची कल्पना मला मुळींच नाहीं. यदृच्छेनें जें काय माझ्या हातून घडतें तें मी करतों. त्र्यंबकेश्वर सर्वसाक्षी आहे आणि मजकडून कांहीं पुण्य कार्य घडलें आहे असें जर त्याचें म्हणणें असेल तर त्या पुण्याचें उदक तुमच्या रोगपरिहारासाठीं मी तुमच्या हातावर ह्या घटकेस सोडावयास तयार आहें.' इतकें बोलून त्यांनीं त्या विप्राच्या हातावर उदक सोडलें. तें त्यानें आपल्या अंगास लावतांच त्याचें कुष्ट पार मावळलें व तो पूर्ण निरोगी झाला. नाथांचे अनंत उपकार मानून तो ब्राह्मण आपल्या गांवीं परत गेला.

नाथांचा मुलगा हरि पंडित एकदां काशीहून गंगेची कावड घेऊन ती रामेश्वरास नेऊन घालण्यासाठीं दक्षिणेंत आला असतां वाटेंत पैठणास उतरला. तो तेथें येतांच नाथ महाराजांसहित गांवातले पुष्कळ लोक त्यास सामोरे गेले. गोदेच्या वाळवटांत एक गाढव उन्हाच्या तापानें अगदीं मरणोन्मुख होऊन पडलें होतें. त्याची ती करुणाजनक स्थिति पाहून नाथमहाराजांचें मन भडभडून आलें आणि हरिपंडितानें आपल्या खांद्यावरून वाहून आणलेली गंगेची कावड त्यांनीं त्या गाढवाच्या अंगावर नेऊन ओतली. नाथांचें हें कृत्य पाहून त्यांच्या विक्षिप्तपणाबद्दल तेथें जमलेल्या सर्व ब्राह्मणांस मोठा राग आला. परंतु त्यांतल्या त्यांत हरिपंडितास तो प्रकार पाहून जो विलक्षण संताप आला, त्याचें वर्णन करणें कठीण. त्याच्या अंगीं जर शाप देण्याचें सामर्थ्य असतें तर त्या संतापाच्या भरांत नाथांस कदाचित् तो शाप देण्यासहि चुकला नसता; परंतु त्या सामर्थ्याच्या अभावीं मनांतल्या मनांत पुटपुटत स्वस्थ बसण्याशिवाय त्यास गत्यंतर नव्हतें. पण ती गोष्ट त्याच्या मनास इतकी लागून राहिली कीं रात्रौ त्यास झोंपही येईना. आपण एवढ्या

# वंदन साईनाथ पदातें

सद्‌गुरुनाथा ! पूर्ण समर्था ॥ हो मम त्राता, संकट हर्ता ॥
हेचि विनंती त्वच्चरणातें ॥ वंदन साईनाथ पदातें ॥ १ ॥
लोचन जें जें लोकिं पहाती ॥ तेथ दिसावी सद्‌गुरु मूर्ती ॥
हेचि विनंती त्वच्चरणातें ॥ वंदन साईनाथ पदातें ॥ २ ॥
ज्या स्थलिं लोभें मन्मन धांवे ॥ त्या स्थलिं त्यांची पूर्ण नटावें ॥
हेचि विनंती त्वच्चरणातें ॥ वंदन साईनाथ पदातें ॥ ३ ॥
जें वच वाणींतून निघावें ॥ तें गुरु-नामें युक्त असावें ॥
हेचि विनंती त्वच्चरणातें ॥ वंदन साईनाथ पदातें ॥ ४ ॥
मत्श्रवणांनीं जें परिसावें ॥ त्यांत गुरुंचें स्तोत्र असावें ॥
हेचि विनंती त्वच्चरणातें ॥ वंदन साईनाथ पदातें ॥ ५ ॥

—कवी किरात

---

गीतारहस्य सर्वांना सुलभ करून सांगण्याकरितां ज्ञानेश्वरांनीं अवतार घेतला. सामर्थ्याचा मार्ग दाखविण्याकरितां रामदास जन्मले व तुम्हां आम्हांकरितां एकनाथांचा जन्म झाला. त्यांनीं भक्त कसा असावा व देव कोणाला म्हणावें, ह्या गोष्टी भागवतांतून सांगितल्या आहेत. हें भागवत वाचल्यानें मनाला शांतता वाटून कृतार्थता वाटेल. हरिभक्ति करावी, साधुसमागम ठेवावा व ईश्वरावर निर्मळ प्रेम ठेवावें, हेंच भागवत धर्माचें सार आहे.

—न्यायमूर्ती रानडे

---

परिश्रमानें काशीहून आणलेली कावड गर्दभासारख्या अमंगल जनावरास आपल्या वडिलांनीं घालावी आणि अशारीतीनें सर्व लोकांदेखत आपला मानभंग आणि मनोभंग करावा ह्या विचार त्यास अत्यंत दुःखद वाटला. पुढें पहांटेस त्यास थोडीशी झोंप लागली तेव्हां प्रत्यक्ष रामेश्वरानें त्याच्या स्वप्नांत येऊन त्यास म्हटलें, ' हरिपंडित, तूं आणलेली गंगेची कावड नाथांनीं गाढवास घातली याबद्दल तू बिलकूल खेद करूं नकोस; कारण अशा शंभर कावडी तू मला आणून घातल्या असल्यास तरी तुला जेवढें पुण्य लाभलें तेवढें पुण्य नाथांनीं गाढवास घातलेल्या ह्या एका कावडीनें तुला लाभलें आहे. '

असे श्रीएकनाथ महाराज सर्वोतोपरी थोर संत होते आणि प्रत्यक्ष मूर्तिमंत दयासागरही होते.

---

# SHRI SAI BABA

Dost thou live a life of fakir
Adopt ways strange and queer
To hide thyself from the gaze
of men ? Inscrutable 're thy ways
Who can fathom thy nature divine ?
Thou art mad, wise and fine
Thy anger frightens and drives away all
But thy love and sweetness recall '
Who art thou, a Muslim or Hindu ?
Chantest thou with love Ram and Rahim, too '
Nay, Universal is thy religion,
For every face's God's visiul
A man of Miracles art thou
Even Gods obey thy command and how '
But in thee there is no Vanity
Sayst thou 'Allah Malike, what a humility '
Thou hast a Divine eye
Which penetrates Earth & Sky '
Sitting in Masjid dost thou unravel
The mysteries of Earth and Heaven
Thou art none but immortal '
Thou hast come to lead the Mortal
From darkness to light
And end his sorrow and plight
Thou art installed in our heart
With thee we'll ne'er part
For thou art our Ram and Rahim
Till eternity we'll adore and esteem.

— Dr. Bakht N.
L. C. P. S.

# श्रीसाईनाथ वाचनालयास मिळालेलीं देणगी पुस्तकें

| भक्तांची नांवें | पत्ता | पुस्तकें | पुस्तकांची नांवें |
|---|---|---|---|
| (१) श्री. अशोक विष्णु प्रधान | कल्याण | ४ | (१) नेताजींचे सहवासांत<br>(२) धुके निवळल्यावर<br>(३) विसाव्याचे क्षण<br>(४) माझा मारुती |
| (२) श्री. आदिलाल मुली कोष्टी | मुंबई | ३ | (१) स्वामी विवेकानंद चरित्र<br>(२) भक्तीयोग<br>(३) कर्मयोग |
| (३) श्री. विनाकराव घाटे | शिर्डी | १ | कल्याण तिर्थांक अंक (हिंदी) |
| (४) श्री. श्रीवनेशस्वामी | मद्रास | १ | श्रीराम चरित मानस (,,) |
| (५) श्री. व्ही. के. चारी | कोईमतूर | ५ | (१) श्रीसाईबाबा पु. (मल्याळी)<br>(२) गॉस्पेल ऑफ साईबाबा (इंग्लीश)<br>(३) लाईफ ऑफ साईबाबा तीन पुस्तकें (इंग्लीश) |
| (६) श्री. व्ही. ए. कामत | मुंबई | ३ | (१) श्रीमद्भगवद्गीता (इंग्लीश)<br>(२) लाईट ऑन दि पाथ ऑफ सेल्फ रियलाईझेशन<br>(३) लाईट ऑफ दि सोल |
| (७) श्री. भाऊ तुकाराम भुजबळ | शिर्डी | ४ | (१) गीतगंगा } हिंदी<br>(२) रक्षाबंधन } हिंदी<br>(३) पं. जवाहर नेहरू जीवनकी एक झलक (हिंदी)<br>(४) शिलास मारनर (इंग्लीश) |
| (८) सेक्रेटरी श्रीसाईनाथ उ. स. | इंदूर | ४ | (१) श्रीसाईदर्शन २ पु. (हिंदी)<br>(२) साई प्रार्थना—प्रदीप दोन पुस्तकें (हिंदी) |

(९) **श्री. गणपतराव तात्याजी कोते पाटील,** श्रीसाईबाबा संस्थान सदस्य शिर्डी, यांनीं मुंबई सरकारनें दोन भागांत छापून प्रसिद्ध केलेल्या गाथेचे एकत्र संपूर्ण पुनर्मुद्रण असलेली "तुकाराम बावांच्या अभंगाची गाथा" भेट दिली.

(१०) **श्री. टी. ए. धारणकर,** सावंतवाडी यांनीं 'सत्यप्रकाश' साप्ताहिक सुरू केलें.

—व्यवस्थापक

## श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | किंमत रु. न. पै. |
|---|---|
| (१) श्रीसाईसच्चरित (मराठी) | ७ – ०० |
| (२) श्रीसाईसच्चरित (हिंदी) | ४ – ५० |
| (३) श्रीसाईसच्चरित (इंग्रजी) | ४ – ०० |
| (४) श्रीसाईसच्चरित (गुजराथी) | ३ – ७५ |
| (५) श्रीसाईनाथ-स्तवनमंजरी | ० – १२ |
| (६) दासगणूकृत (४ अध्याय) | ० – ५० |
| (७) सगुणोपासना | ० – २५ |
| (८) प्रधानकृत साईबाबा शिर्डी (इंग्रजी) | १ – ०० |
| (९) श्रीसाईलीलामृत (मराठी) | २ – ०० |
| (१०) श्रीसाईलीलामृत (हिंदी) | २ – ५० |
| (११) श्रीसाईसुमनांजलि | ० – ०६ |
| (१२) कीर्तनपंचक | १ – ५० |
| (१३) शीलधी | ० – ७५ |
| (१४) साईबाबा अवतार व कार्य | २ – ०० |
| (१५) श्रीसाईगीतांजली | ० – १२ |
| (१६) रुद्राध्याय (११ वा) | ० – १२ |

(पोस्टेज निराळें)

वरील पुस्तकांकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

१. सरकाकून, श्रीसाईबाबा **संस्थान**, पोष्ट–शिरडी, जि. अहमदनगर.

२. मुंबई ऑफिस, ईस्ट आणि वेस्ट इन्शुअरन्स् बिल्डिंग,
५५ अपोलो स्ट्रीट, कोट, मुंबई १.




## जुलै १९६०

**या** महिन्यांत बाहेरगांवच्या भक्तांची गर्दी बरीच कमी प्रमाणांत होती.

### कलाकारांची हजेरी

**कीर्तन** :– श्री. श्री. बा. उर्फ बाबुराव देव वकील ठाणें (सं. ट्र.) श्री. ह. भ. प. जेऊरकर मु. जेऊर, श्री. ह. भ. प. भगवानदास महाराज मांजरी. श्री. मराठे गवई यांचा श्री. नामदेव पुण्यतिथी, श्री. सावंतामाळी पुण्यतिथी निमित्त कीर्तनें श्रीमंदिरांत झाली.

**गायन** :– श्री. वसंत परशराम मांडके पुणें, श्री. पांडुरंग देविदास उबाळे पुणें, श्री. पंडीत जगन्नाथबुवा सुरतकर साकोरी, कु. सरस्वती द. लाखे खेड, श्री. दत्तात्रय ना. लाखे खेड. श्री. होना शंकर लाखे खेड, श्री. गोविंद मंगले, श्री. नामदेव लक्ष्मण कोळी, श्री. शांताराम कोक्षे, श्री. मोहन कोळी, श्री. अनंत कोळी.


**न्यू कला डॉन्सींग पार्टी कोपरगांवः**—श्री. नारायण हेवरे श्री. एच. के. सुरतवाला श्री. अण्णा महास श्री. शंकर वाघमारे श्री. शंकर पंडोरे, श्री. गोरखनाथ जाधव श्री. पंजी वायखंड, श्री. इंगळे, कु. बिना कु. शांता श्री. बोधे संगीत नाटका-प्रमाणें सोंगे घेऊन गारूड भजन ( श्री अरुणोदय संगीत भजनी मंडळी. ) मु. एली मनोळी ता. हुकेरी जि. बेळगांव.

**नकलाः**—श्री. लव्हाटे मुंबई यांच्या नकला झाल्या.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज** यांची सामुदायिक प्रार्थना, भाषण, शंका निरसन चर्चा व भजन असा कार्यक्रम झाला. साई संस्थान तर्फे सन्माननीय ऑ. चिटणीस श्री. हरिभाऊ शेळके यांनी त्यांचे आभार मानून त्यांना संस्थानतर्फे २०१ रुपये देणगी दिली.

**शिर्डी येथील हवापाणीः**—पाऊस विशेष नाहीं. आभाळ भरून आलेलें असे.

---





तारेचा पत्ता : 'ABHAY' Hyderabad. टेलिफोन नं. ४६३८

# हैद्राबाद सॅनेटोरियम


**खास क्षयरोग्यांसाठीं !**

हवेशीर आधुनिक सुखसोयींनीयुक्त अत्यंत माफक दर असलेलें व साईभक्तांनीं
चालविलेलें एकमेव ठिकाण.
पुण्याहून रेल्वेनें फक्त बारा तासांचा प्रवास.

**गरीब साईभक्तांसाठीं खास सवलत**

विशेष माहितीकरितां खालील पत्त्यावर लिहा :—

**सुपरिंटेंडेंट हैद्राबाद सॅनेटोरियम,**
**रमतापूर, हैद्राबाद १३. [ आंध्र प्रदेश ]**







★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आ णि म्ह णू न च
हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,
ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि
आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण
सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं तयार केलेले श्री साईबाबांचें तीन रंगी चित्र, द्वारकामाई व इतर एक रंगी फोटो—साईज १० × ८, १० × १४, १४ × २० व पोस्टकार्ड साइज खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

श्री. सगुण मेरु नाईक
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर

मुद्रक: श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : ना. आ. सावंत, ईस्ट ॲन्ड वेस्ट
इन्शुअरन्स बिल्डिंग, ४९/५५, आपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.